दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२६३ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, ७ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

शिंदे गटाच्या 'या' नेत्याचा मोठा दावा; नरेंद्र मोदी आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार!

ठाणे, यश सावंत :

लोकसभा निवडणूक या किंवा पुढच्या आठवड्यात जाहीर होऊ शकते अशी परिस्थिती आहे. अशात भाजपाच्या प्रचारसभा सुरु झाल्या आहेत. महाराष्ट्रात अमित शाह यांचा दौरा आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील राज्यात येतील. या सगळ्या वातावरणात एक चर्चा रंगली आहे ती म्हणजे उद्धव ठाकरे भाजपासह जातील का? याचं महत्वाचं कारण आहे ते म्हणजे शिंदे गटाच्या आमदाराने केलेलं वक्तव्य. शिंदे गटाच्या आमदाराने एक हजार टक्के खात्रीने सांगितलं आहे की उद्धव ठाकरे भाजपासह जातील आणि लवकरच ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतील. लोकसभा निवडणुकीला काही दिवसच राहिले आहेत. इंडिया आघाडी

देशात आणि महाविकास आघाडी राज्यात अशी विरोधकांची आघाडी आहे. त्या आघाडीत उद्धव ठाकरे, शरद पवार यांचे पक्ष आणि काँग्रेस आहे. उद्धव ठाकरेंच्या प्रचारसभाही जोरात सुरु आहेत. २०१९ मध्ये जेव्हा भाजपासह त्यांनी निवडणूक लढवली होती, त्या निवडणुकीच्या निकालानंतर मुख्यमंत्रिपद अडीच-अडीच वर्षे वाटून घेण्यावरुन दोन्ही पक्षात टोकाचा संघर्ष झाला. त्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या समीकरणाची महाविकास आघाडी अस्तित्वात आली. हे सगळं घडलं असलं तरीही २०२२ मध्ये शिवसेनेत बंड झालं आणि २०२३ मध्ये राष्ट्रवादीत बंड झालं. या सगळ्यानंतर महाराष्ट्राचं राजकारण एक प्रकारे ढवळून निघालं आहे. लोकसभेचे निकाल काय लागतात ते पाहणं महत्त्वाचं आहे. अशात शिंदे गटाच्या आमदाराने उद्धव ठाकरे आणि नरेंद्र मोदींची भेट होईल आणि ते भाजपासह येतील असा दावा छातीठोकपणे केला आहे. हे आमदार दुसरे तिसरे कुणीही नसून शहाजी बापू पाटील आहेत. काय झाडी, काय डोंगार काय हाटेल.. ओके मध्ये आहे सगळं या फोनमुळे ते महाराष्ट्रात प्रसिद्ध झाले. त्यांनी आता उद्धव ठाकरे भाजपासह येतील असा दावा केला आहे.

एक हजार टक्के उद्धव ठाकरे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी एकत्र येणार हे आज तुम्हाला सांगतो. आपला अंदाज चुकणार नाही. दिवस कुठला ते बघावं लागेल. पण हे व्हावंच लागेल कारण हिंदुत्वाचा विचार त्यामागे आहे. हिंदुत्वाचा विचार बाजूला ठेवता येणार नाही. पंतप्रधान मोदींकडे उद्धव ठाकरेंना जावं लागण्याचा दिवस येणार आहे. लवकरच येणार आहे, राम मंदिर बांधल्यापासून एक वेगळं वातावरण आहे. अशा वातावरणात जर उद्धव ठाकरेंनाही वाटलं की आपणही भाजपासह जावं तर त्यात गैर काही नाही. महायुतीला लोकसभा निवडणुकीत ४५ जागा मिळतील असाही दावा शहाजी बापू पाटील यांनी केला आहे.

४०० कर्मचाऱ्यांचे काम करतायेत १०० कर्मचारी; एसटी कर्मचाऱ्यांची दयनीय अवस्था

ठाणे, प्रगती शर्मा:

एसटी महामंडळाच्या कळवा येथील विभागीय कार्यशाळेतील कर्मचारी हे आता विविध समस्यांनी ग्रासले असून या समस्यांना वाचा फोडण्यासाठी येथील कर्मचाऱ्यांनी भाजपचे आमदार संजय केळकर यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. ४०० कर्मचाऱ्यांचे काम हे १०० कर्मचाऱ्यांना करावे लागत आहे. आरटीओ पासींग गाड्यांची कामे तीन दिवसाऐवजी एका दिवसात करुन घेतली जात असल्याचेही त्यांनी या पत्रात नमुद केले आहे. एकूणच यातून मार्ग काढावा अशी मागणी त्यांनी या पत्राद्वारे केली आहे. कळवा येथील विभागीय कार्यशाळेचे बांधकाम हे २० वर्षे जून असून पूर्वी याठिकाणी ४०० च्या आसपास कर्मचारी कार्यरत होते, परंतु २०१७ नंतर नवीन कर्मचाऱ्यांचीच भरतीच न झाल्याने ४०० कर्मचाऱ्यांचे काम १०० कर्मचाऱ्यांना करावे लागत आहे. या ठिकाणी आरटीओ पासीगंच्या

गाडयांची कामे तसेच ८ डेपोच्या गाडयांच्या रिपेअरिंगचे कामे, बॉडीची कामे, पेंटींगची कामे, तसेच इंजिन गेअरबॉक्स, क्लचप्लेट, क्रशर प्लेट, पिनीअन, जॉईटस रेडीएटर, पाटे, वेल्डींग, अपोहस्टर खाते, इलेक्ट्रीशिअनची कामे, फ्रंट एक्सल ही सर्व रिपेअरिंगचे कामे जवळपास ७०० गाडयांची कामे केली जातात ही कामे करत असतांना कर्मचा-यांना अनेक समस्या भेडसावत आहेत. आरटीओ पासिंग गाडयांची कामे ३ दिवसाचे काम एका दिवसामध्ये सक्तीने करुन घेतले जाते. नाही केल्यास प्रशासकीय दबाव टाकला जातो. म्हणजेच बदली करून चार्जशिट घेऊन पंचिंग कार्ड जमा करून अर्धा दिवसाचा पगार कापुन अशा धमक्या देऊन कर्मचाऱ्यांची मानसिक खराब केली जाते. हेवी वर्क असल्याने ५० टक्के कर्मचारी हे शारिरीक व्याधीनी त्रस्त आहेत. व काही कर्मचारी नोकरी सोडण्याच्या तयारीत आहेत. संपुर्ण वर्कशॉपचे बांधकाम पडण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे९० ते१०० कर्मचाऱ्यांचा जिव धोक्यात आहे. टॉयलेट, बाथरुम अस्वच्छ व पडक्या स्थितीत आहे व तसेच वर्कशॉपच्या आवारामध्ये साफसफाई केली जात नाही, अपघात झाल्यास प्रथमोपचार पेटीच रुग्णवाहिकेची सोय नाही.

बनावट बटरची निर्मिती करुन त्याची नामांकित कंपनीच्या नावे विक्री करणाऱ्या दोघांना अटक

डोंबिवली, नितीन देवळेकर :

डोंबिवली जवळील खोणी गावात बनावट बटरची निर्मिती करुन त्याची नामांकित कंपनीच्या नावे विक्री केली जात होती. कल्याण डोंबिवली सह आसपासच्या परिसरात सँडविच विक्रेत्यांसह, धाबे हॉटेल्स मध्ये नामांकित बटर असल्याचे भासवून त्याची विक्री केली जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. कल्याण गुन्हे शाखेने या बटर निर्मितीच्या कारखान्यावर छापा मारत दोन जणांना अटक केली. पिंटु झिनक यादव (वय 36) आणि प्रेमचंद फेकुराम (वय 32) अशी अटक आरोपींची नाव आहेत. पोलिसांनी कारखान्याच्या ठिकाणाहून अवैध बटर बनविण्यासाठी लागणारे साहित्य, मशिन वइतर कच्चा माल, नामांकित कंपनीचे कागदी बॉक्स असा सुमारे 2 लाख 93 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कल्याण गुन्हे शाखेचे पोलिस हवालदार दत्ताराम भोसले व गुरुनाथ जरग यांना मंगळवारी गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की खोणी गावात संतलाल शर्मा यांनी नविन निमार्णाधीन इमारत आहे. याठिकाणी बनावट बटर बनविले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक नरेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल म्हस्के. पोलीस अधिकारी संदीप चव्हाण, पोलीस कर्मचारी दत्ताराम भोसले, गुरुनाथ जरग, अनुप कामत यांच्या पथकाने कारखान्यावर छापा मारत कारवाई केली. कारवाई दरम्यान पिंटू व प्रेमचंद हे बनावट बटर बनविताना आढळून आले. तसेच माहिती मिळाली की, कारखान्याचा मालक पिंटू हा सदरचे बटर हे वनस्पती पामोलीन तेल, मीठ, फुड कलर यांचे

महिला पोलीस कर्मचाऱ्याचा लोकलमधून पडून मृत्यू

मुंबई, विशाल पाटील :

लोकलने प्रवास करणाऱ्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्याचा लोकलमधून पडून मृत्यू झाल्याची घटना नाहूर रेल्वे स्थानक दरम्यान घडली आहे. याबाबत कुर्ला लोहमार्ग पोलिसांनी घटनेची नोंद करत तपास सुरु केला आहे. अश्विनी डोमडे (वय २७) असे या मयत महिला पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. ही महिला लोकलने प्रवास करत असताना लोकलमधून पडली. नाहूर रेल्वे स्थानकातील कर्मचाऱ्यांना याची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन जखमी महिलेला मुलुंडच्या अगरवाल रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर तिला एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. तिच्या ओळखपत्रावर तिने अकोला येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतल्याचे समोर आले आहे. त्यानुसार कुर्ला लोहमार्ग पोलीस याबाबत अधिक तपास करत आहेत.

दंड आकारल्याने रिक्षा चालक वाहतूक पोलिसांशी भररस्त्यात भिडला; कल्याणमधील खळबळजनक घटना

कल्याण, दिगंबर जाधव :

वाहतुकीचे नियम न पाळल्यास त्या व्यक्तीवर दंडात्मक कारवाई केले जाते. मात्र कल्याणमध्ये वाहतूक पोलिसाने दंडात्मक कारवाई केल्यानंतर त्यांना त्रास देण्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या अधिक माहितीनुसार,कल्याण पश्चिमेकडील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नो पार्किंगमध्ये एक रिक्षा उभी होती. वाहतूक पोलिसांनी यासाठी रिक्षा चालकावर दंडात्मक कारवाई केली आणि तेथून दुसरीकडे गेले. पुढे काही क्षणातच रिक्षा चालकाने वाहतूक पोलिसाला गाठले. त्यानंतर वाहतूक पोलीस आणि रिक्षा चालकामध्ये वाद सुरू झाला.

रिक्षा चालक आणि वाहतूक पोलीस आपसात भिडले. भर रस्त्यात हा गोंधळ सुरू झाला या ठिकाणी नागरीकांची एकच गर्दी झाली होती. कल्याणमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे वाहतूक पोलिसांकडून या परिसरात नो पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या गाड्यांवर सतत कारवाई केली जाते. या कारवाईमुळे अनेकदा नागरिक व वाहतूक पोलिसांमध्ये वाद झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौकात एका रिक्षा चालकाची रिक्षा नो पार्किंग झोनमध्ये उभी होती. वाहतूक पोलिसांनी या रिक्षाला दंड आकारला व वाहतूक पोलिसांची गाडी पुढे जाताच या रिक्षा चालकाने वाहतूक पोलिसांची गाडी अडवली. वाहतूक पोलीस कर्मचारी रोहिदास गावित यांच्यासोबत हुज्जत घालण्यास सुरुवात केली. या दोघांमध्ये वाद झाला, भर रस्त्यात हा गोंधळ सुरू होता. अखेर गस्तीवर असलेल्या पोलिसांनी मध्यस्थी केली. त्यानंतर वाहतूक पोलीस कर्मचारी रोहिदास गावित यांनी मी दंड आकारल्याने रिक्षा चालक माज्याशी हुज्जत घालत असल्याचे सांगितले.

नवी मुंबईत ४० किमीचा नवा सायकल ट्रॅक, १६ कोटी रुपये खर्च होणार

नवी मुंबई, भावना जैन :

पर्यावरणपूरक शहराची संकल्पना राबवण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महापालिकेने सुरू केलेल्या जनसायकल व इलेक्ट्रिक बाइक प्रणालीला नवी मुंबईकरांकडून भरघोस प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे महापालिकेने आणखी एक पाऊल पुढे टाकून ४० किमी नव्या सायकल ट्रॅकचे नियोजन केले आहे. शहरातील कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण आणि पर्यावरणपूरक दळणवळण व्यवस्था निर्माण करणे हा त्यामागील हेतू आहे. याआधी महापालिकेने नेरूळ आणि वाशी येथे सायकल मार्गिका तयार केल्या आहेत. त्यात आणखी नवीन सायकल मार्गिका तयार होऊन अधिकाधिक नवी मुंबईकरांना याचा लाभ घेता येणार आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी महापालिकेतर्फे विविध उपाययोजना केल्या जात असतात. जनसायकल सहभाग प्रणाली योजना राबवून नवी मुंबई महापालिकेने नागरिकांना सायकल आणि बॅटरीवरील दुचाकी भाडेतत्त्वावर देण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. याआधी महापालिकेने वाशी येथे सागर विहार परिसर ते सेक्टर नऊपर्यंत सुमारे दोन किलोमीटरची सायकल मार्गिका तयार केली आहे. नेरूळला पामबीच रस्त्यालगत सेवारस्त्यावर सायकल मार्गिका आहे. पामबीच मार्गावरील नऊ मीटरच्या जागेमध्येच ही मार्गिका आहे.

वडाळा-घाटकोपर-ठाणे मेट्रो मार्गिकेचे काम ६५ टक्के पूर्ण, ठाण्यात डिसेंबर २०२५ नंतर मेट्रो धावणार

ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे शहरातील वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला प्रकल्प वडाळा-घाटकोपर-कासारवडवली या मेट्रो चार मार्गिकेचे काम डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. खासदार राजन विचारे यांनी मंगळवारी सायंकाळी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) विभागातील अधिकाऱ्यांसोबत पाहणी केली. त्यावेळी अधिकाऱ्यांनी हा प्रकल्प ६५.३२ टक्के पूर्ण झाला असून डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती दिली. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास घोडबंदरच्या कोंडीतून नागरिकांची सुटका होण्याची शक्यता आहे. तसेच मध्य रेल्वेच्या वाहतुकीवर होणारा ताण देखील कमी

होऊ शकतो. मुंबईपासून जवळचे शहर असल्याने ठाणे शहरात गृह खरेदी वाढली आहे. घोडबंदर भागात प्रकल्पांची उभारणी अधिक होत आहे. त्यामुळे रस्ते मार्गावर देखील वाहतुकीचा ताण आला असून दररोज शहरात वाहतुक कोंडीची समस्या भेडसावत आहे. शहरातील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी आणि रेल्वे गाड्यांत होणारी गर्दी कमी करण्यासाठी २०१६ मध्ये वडाळा-घाटकोपर-कासारवडवली या मार्गिकेच्या निमार्णाचा निर्णय घेण्यात आला होता. सध्या या मार्गिकेच्या कामांमुळे घोडबंदर भागात मुख्य रस्ते, सेवा रस्त्यांवर लोखंडी पत्रे उभारण्यात आले आहेत. या पत्र्यांमुळे रस्ते अरुंद झाले असून घोडबंदर भागात राहणाऱ्या नागरिकांना दररोज सकाळी आणि रात्रीच्या वेळेत कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. मेट्रो प्रकल्पाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी खासदार राजन विचारे यांनी एमएमआरडीए, महापालिका अभियंते आणि वाहतुक पोलिसांसोबत पाहाणी केली. येथील कापुरबावडी जंक्शन, तत्त्वज्ञान विद्यापीठ, मानपाडा उड्डाणपूल, पातलीपाडा जंक्शन, वाघबीळ, कासारवडवली आणि भाईंदर पाडा येथे प्रत्यक्ष पाहाणी करण्यात आली. डिसेंबर २०२५ पर्यंत मेट्रो मार्गिकेचे काम पूर्ण होणार असल्याची माहिती यावेळी अभियंत्यांनी दिली. त्यामुळे सुमारे दीड ते दोन वर्षांत ठाणे शहरात मेट्रो धावण्याची शक्यता असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

▶ भक्ती पार्क ते अमर महल या मार्गावर असणारी मेट्रो स्थानके - भक्ती पार्क मेट्रो, वडाळा टी टी, अनिक नगर बस डेपो, सिद्धार्थ कॉलनी- कामाची स्थिती - ४६.५३%

▶ गरोडिया नगर ते सूर्या नगर या मार्गावर असणारी मेट्रो स्थानके- गरोडिया नगर, पंतनगर, लक्ष्मी नगर, श्रेयस सिनेमा, गोदरेज कंपनी, विक्रोळी मेट्रो, सुर्यानगरकामाची स्थिती झ ८७.८१ %

▶ गांधिनगर ते सोनापूर या मार्गावर असणारी मेट्रो स्थानके- गांधिनगर, नवल हाऊसिंग, भांडुप महापालिका, भांडुप मेट्रो, शंग्रीला, सोनापूरकामाची स्थिती - ५४%

अखंडीत मोबाईल सेवा मिळणार, भुयारी मेट्रो ३ प्रवासादरम्यान

मुंबई,सचिन कदम :

कुलाबा-वांद्रे-सीप्झ भुयारी मेट्रो ३ मार्गिकेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अखंडित मोबाईल सेवा पुरविण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) ने पुढाकार घेतला आहे. प्रवासादरम्यान मोबाईल नेटवर्कची समस्या निर्माण होऊ नये यासाठी एमएमआरसीने सौदी अरेबियातील रियाध शहरात असलेल्या एसीईएस या कंपनीच्या इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या उपकंपनीशी करार केला आहे. त्या करारानुसार संबंधित कंपनीकडून मेट्रो ३ करता दूरसंचार पायाभूत सुविधा प्रदान केल्या जाणार आहेत. रियाध येथे आयोजित एका कार्यक्रमात या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. त्यावेळी एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे, संचालक (नियोजन आणि रिअल इस्टेट

डेव्हलपमेंट) आर. रमणा, संप्रेषण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय विभागातील दूरसंचार आणि पायाभूत सुविधांचे उपमंत्री बस्सम ए. अल-बस्सम, एसीईएसचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अक्रम अबुरस, मुख्य तंत्रज्ञान अधिकारी डॉ. खालिद अलमाशौक, एसीईएस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक मोहम्मद मजहर तसेच अमित शर्मा, सौदी एक्झिम बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नईफ अल शम्मारी, भारतीय दूतावास यांच्यावतीने मिशन आणि मनुस्मृती - समुपदेशकचे उपप्रमुख अबू माथेन जॉर्ज आदी मान्यवर उपस्थित होते.

महापालिकेला 'एसईआयएए'चा दणका! पवना, इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा

पिंपरी, अभिजित येरुल्लू :

शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी या नद्यांचे पुनरुज्जीवन करताना नदीची वहन क्षमता कमी होता कामा नये, नदीचे शुद्धीकरण झाले पाहिजे, पर्यावरणीय समतोल साधला जाईल, याची काळजी घ्यावी. त्याबाबत केंद्रीय जल आणि ऊर्जा संशोधन केंद्र (सीडब्ल्यूपीआरएस) यांच्याकडून पडताळणी करून नव्याने अर्ज सादर करण्याचे निर्देश राज्य पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने (एसईआयएए) महापालिकेला दिले आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्या वाहतात. पवना नदीची महापालिका हद्दीतील लांबी २४.३४ किलोमीटर, इंद्रायणी नदीची एकूण लांबी २०.८५

किलोमीटर आहे. तर, मुळा नदी शहराच्या सीमेवरून दहा किलोमीटर अंतर वाहते. तीनही नद्यांसाठी एकूण तीन हजार ५०६ कोटींचा खर्च महापालिका करणार आहे. या प्रकल्पातील पहिल्या टप्प्याच्या खर्चासाठी महापालिकेने दोनशे कोटींचे कर्जरोखे २७ जुलै २०२३ रोजी काढले आहे. वाकड बायपास ते सांगवी पुलापर्यंतच्या मुळा नदीच्या विकासासाठी हा निधी वापरण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्यासाठी राज्य शासनाच्या राज्य पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाची (एसईआयएए) मंजुरी आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेने परवानगीचा अर्ज केला होता. परंतु, तो फेटाळण्यात आला. नदीचे पुनरुज्जीवन करताना पूर पातळी वाढणार नाही. भारतीय मानकशास्त्राचे पालन करावे. नदीची वहन क्षमता कमी होता कामा नये, नदीचे शुद्धीकरण झाले पाहिजे. पर्यावरणीय समतोल साधला जाईल, याबाबत केंद्रीय जल व ऊर्जा संशोधन केंद्र यांच्याकडून पडताळणी करावी. त्यानंतरच अर्ज मंजुरीसाठी पाठविण्याची सूचना एसईआयएए ने केली. त्यानुसार महापालिकेने पडताळणी करून घेतली असून, मान्यतेसाठी अर्ज केला जाणार आहे.

ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिलांना महापालिका देणार मदतीचा हात

मुंबई, विशाल कारंडे :

पालिकेच्या नियोजन विभागामार्फत समाजातील गरजू आणि अल्प उत्पन्न असलेल्या घटकांना सक्षमीकरणासाठी योजना प्रभावीपणे राबविण्यात येलात, यामध्ये गरजू महिला, अपंग, ज्येष्ठ नागरिक, तृतीय पंथीय यांच्या सामाजिक कल्याणासाठी पालिका वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करीत असते. यंदा अर्थसंकल्पात विकास नियोजनासाठी ८०० कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. पालिकेच्या महिला व बाल कल्याण योजनेंतर्गत २००९ पासून महिला बचत गटांची स्थापना करण्यात येत आहे. महिला बचत गटांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने महिलांना केंद्रबिंदू मानून विविध योजनांच्या माध्यमातून गरीब व गरजू महिलांना एकत्रित करून योजनेचा लाभ देण्यात येत आहे. यंदापासून प्रत्येक बचत गटाला प्रत्येकी एका लाख याप्रमाणे थेट आर्थिक साहाय्य दिले जाणार असल्याची माहिती स्वतः आयुक्त इकबालसिंह चहल यांनी दिली. महिला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा, त्यांचे जीवनमान उंचावणे शक्य व्हावे, विकासकामांत त्यांचा सक्रिय सहभाग असावा, यासाठी जेंडर बजेट अंतर्गत योजनांची अंमलबजावणी केली जाते.

प्रकाश आंबेडकरांच्या चेहऱ्यावर दिसलं हास्य! मविआसोबतच्या बैठकीत जागा वाटपाचा तिढा सुटला?

■मुंबई ,प्रतिनिधी,

महाविकास आघाडीचा लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. वंचित बहुजन आघाडीच्या मागणीमुळं हे जागा वाटप रखडल्याचं बोललं जात होतं. याच पार्श्वभूमीवर आज हॉटेल फॉर सिझन्समध्ये सुमारे ४ तास बैठक पार पडली. यामध्ये मविआच्या बैठकीत वंचितचे समन्वयक प्रकाश आंबेडकर यांनी हजेरी लावली. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती मिळतेय. बैठकीनंतर आंबेडकरांनी जेव्हा माध्यमांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसून आलं. प्रकाश आंबेडकर काय म्हणाले? आजच्या बैठकीत

काय झालं? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला त्यावर आजच्या बैठकीत काहीही निर्णय झाला नाही, याचं ब्रिफिंग वरुन होईल, असं त्यांनी सांगितलं. पण तुम्ही जागा किती मागितल्या? काय मागणी केली? या प्रश्नावर बोलताना आंबेडकर म्हणाले, पुढच्या बैठकीत सर्व गोष्टी ठरतील त्यानंतर आजची बैठक सकारात्मक होती का? या प्रश्नावर माज्या चेहऱ्यावरुन तुम्हाला काय दिसतंय? असा उलटा सवाल त्यांनी पत्रकारांना केला. त्याचबरोबर बाजुला असलेल्या जितेंद्र आव्हाडांनी सकारात्मक, सकारात्मक असं म्हटलं. त्याचवेळी प्रकाश आंबेडकर यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसून आलं. मविआची पुढची बैठक ९ मार्चला एकूणच प्रकाश आंबेडकरांनी या बैठकीला स्वतः हून हजेरी लावली आणि बैठकीनंतर त्यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसून आल्यानं बैठकीत जागा वाटपाबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, मविआची पुढची बैठक ९ मार्च रोजी होणार असल्याचं सांगण्यात आलं आहे.

दैनिक लोकरक्षणाय
www.lokrakshanay.com
ठाणे, गुरुवार, ७ मार्च २०२४

काळजी ऑईली स्कीनची

ऑईली स्किन असणाऱ्या महिलांना उन्हाळा विशेष जाचतो. या दिवसात तैलग्रंथींद्वारे त्वचेवर अतिरिक्त तेल पसरत असतं. घामाची समस्याही असतेच. या थरावर वातावरणातील धूळ, माती आदी घटक जमा होतात आणि त्वचेसंबंधीचे विकार वाढीस लागतात. त्यामुळे या त्वचेची उन्हाळ्यात विशेष काळजी घ्यावी.

▮ऑईल फ्री फेसवॉश नियमित वापरल्यास त्वचा ऑईल फ्री राहते. ग्लिसरीनयुक्त साबणाचा वापर करू नका.

▮त्वचा ऑईली असल्यास क्लिन्झींगला पर्याय नाही. क्लिन्झींगमुळे त्वचेवर साठलेली घाण, मेकअप, मृत त्वचा नाहीसे होऊन रंध्रे मोकळी होतात. या उपायाने ब्लॅकहेड्सची समस्या दूर होते. आठवडा□तून एकदा लाईट स्क्रब केल्याने फायदा होतो.

▮तांदळाच्या पिठीमध्ये पुदीन्याचा अर्क किंवा गुलाबजल मिसळून चेर्हयावर दहा मिनिटे हा पॅक ठेवावा. दहा मिनिटांनंतर हलक्या हाताने चोळून पॅक काढून टाकावा.

▮पर्समध्ये नेहमी गुलाब अथवा लॅव्हेंडर बेस असलेलं स्किन टॉनिक ठेवा. त्याबरोबर वेट टिश्युजही हवेत. दर दोन तासांनी यानं चेहरा स्वच्छ केल्यास त्वचा टवटवीत राहते.

▮ऑईली स्किनवर अँकनेचा त्रास होत असेल तर टी ट्री अँटी पिंपल जेल अथवा जेल मॉईश्चरायझर वापरणं चांगलं.

▮त्वचेचं सीबम ऑईल नियंत्रणात ठेवण्यासाठी तेलकट आणि मसालेदार पदार्थ वर्ज्य केलेले चांगले. तैलीय ग्रंथीमध्ये संतुलन राखण्यासाठी फायबरयुक्त भोजन उपयुक्त आहे. दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणात एकेक डिश सॅलड असणं अतिआवश्यक आहे.

त्वचेचा पोत बिघडण्यासाठी हे पदार्थ असू शकतात कारणीभूत

आपल्या आहारातील मिठाच्या जास्त प्रमाणाने आपल्या चेहऱ्यावर, पायांवर सूज येते. आपल्या डोळ्यांच्या आसपासची त्वचा अतिशय नाजूक असते. जर आहारामध्ये मीठ जास्त असेल, तर डोळ्यांच्या आसपासच्या त्वचेवर देखील सूज येते. त्यामुळे आपल्या आहारामध्ये दररोज ५०० मिलीग्राम पेक्षा अधिक सोडियम ची मात्रा नसावी असे नॅशनल हार्ट अँड ब्लड असोसिएशनचच्या तज्ञांचे मत आहे. त्याचप्रमाणे आपल्या आहारामधील दुध आणि दुग्धजन्य पदार्थ यांच्यामुळे देखील आपल्या त्वचेला नुकसान होऊ शकते. दुधाच्या अतिसेवनाने त्वचेवर मुरुमे पुटकुळ्या, म्हणजेच ॲक्ने होण्याचा संभव असतो. त्यामुळे दुधाचे आणि दुग्धजन्य पदार्थांचे सेवन माफक प्रमाणामध्ये करायला हवे.

साखरेच्या सेवनाने आपल्या शरीरामध्ये अतिरिक्त उर्जा तयार होत असते. ह्याला ह्य एम्पटी कॅलरीज ह्य असे ही म्हटले जाते. ह्या अतिरिक्त ऊर्जेमुळे त्वचेवर विपरीत परिणाम होत असतात. साखरेच्या अतिसेवनाने त्वचेवर सुरकुत्या पडणे, डोळ्यांच्या खाली सूज येणे, ॲक्ने, त्वचेवर काळसर डाग दिसून येणे, अश्या तक्रारी उद्भवू शकतात.

तज्ञांच्या मते एका दिवसामध्ये पुरुषांनी ३७.५ ग्राम, तर महिलांनी एका दिवसामध्ये २५ ग्राम पेक्षा अधिक ॲडेड शुगर्सचे सेवन करणे टाळायला हवे. त्याचप्रमाणे अति प्रमाणात मद्यपान आणि धूम्रपानाचे देखील त्वचेवर दुष्परिणाम पाहायला मिळतात. आपल्या आहारामधील ग्लूटेनयुक्त पदार्थांमुळे देखील त्वचेच्या पोतामध्ये फरक पडत असतो. ग्लुटेन युक्त पदार्थांच्या सेवनाने हनुवटीवर ॲक्ने येणे, चेहऱ्यावर सूज येणे आणि त्वचा लालसर दिसणे अश्या तक्रारी उद्भवू शकतात. त्यामुळे आपल्या आहारामध्ये मैदा आणि मैद्याने बनलेले पदार्थ यांचे सेवन माफक प्रमाणामध्ये करावे.

आपल्याला सगळ्यांनाच, आपली त्वचा अतिशय सुंदर, नितळ, निरोगी असावी असे वाटत असते. त्यासाठी आपण नाना प्रकारचे उपाय ही वेळोवेळी करीत असतो. पण त्वचेची सुंदरता ही आनुवंशिक असते, आणि त्याशिवाय त्वचा नितळ आणि सुंदर ठेवण्यासाठी त्वचेची योग्य निगा राखणे देखील आवश्यक आहे. आपल्या त्वचेचे आरोग्य आणि आपले खानपा यांचा थेट संबंध आहे हे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. आपण आपल्या आहारामध्ये समाविष्ट केलेले काही पदार्थ आपल्या त्वचेकरिता हानिकारक ठरू शकतात.

सांध्यांमध्ये सातत्याने सूज आणि वेदना हे संधिवाताचे लक्षण आहे. संधिवात निरनिराळ्या प्रकारचा असला, तरी याच्या उपचारपद्धतीमध्ये सांध्यांवरील सूज कमी करून वेदना शमविण्यावर लक्ष केंद्रित केले जात असते. आपल्या आहारामध्ये अनेक पदार्थ असे असतात, जे सांध्यांवरील सूज आणि पर्यायाने वेदना वाढविण्यास कारणीभूत ठरतात. त्यामुळे ज्यांना संधिवाताचा त्रास आहे, त्यांनी आहारातून हे पदार्थ शक्यतो वर्ज्य करावेत आणि वर्ज्य करणे शक्य नसल्यास अतिशय मर्यादित प्रमाणामध्ये या पदार्थांचे सेवन करावे. हे पदार्थ कोणते ते जाणून घेऊ या.

संधिवात असल्यास हे पदार्थ टाळा

अनेकांना दुध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये असलेल्या एका विशिष्ट प्रथिनामुळे सांधेदुखी होऊ लागते. अशा वेळी आहारातून दुध आणि दुग्धजन्य पदार्थांचे प्रमाण कमी करून शरीराला आवश्यक असणारी प्रथिने देणारे इतर पदार्थ आहारामध्ये समाविष्ट करावेत. यामध्ये डाळी, कडधान्ये, टोफू, पालेभाज्या, 'किन्वा'सारखे धान्य यांचा समावेश करता येईल.

ज्या पदार्थांमध्ये साखरेचे प्रमाण अधिक असते (विशेषतः प्रोसेस्ड अन्नपदार्थ) अशा अन्नपदार्थांचे सेवनही अतिशय मर्यादित असावे.

चायनीज किंवा इतरही अन्य खाद्य पदार्थांमध्ये वापरले जाणारे मोनो सोडियम ग्लुटामेट, म्हणजेच अजिनोमोटोच्या सेवनाने संधिवात असलेल्यांच्या सांध्यांवर सूज वाढू शकते. त्यामुळे अजिनोमोटो असणारे अन्नपदार्थ आहारातून वर्ज्य करावेत. तसेच संधिवात असलेल्यांनी आहारामध्ये मिठाचे प्रमाणही कमी असेल याची काळजी घ्यावी.

मद्यपान, धुम्रपान आणि तंबाखूसेवनाने देखील संधिवात बळावतो. सातत्याने तंबाखू सेवन करणाऱ्यांमध्ये किंवा धुम्रपान करणाऱ्यांमध्ये र्‍ुमटॉइड आर्थ्रायटीसचा धोका जास्त असतो. त्याचबरोबर संधिवात असणाऱ्यांनी ॲस्पारटेम युक्त कृत्रिम स्वीटनर्सचा ही वापर टाळावा. तसेच मैद्यापासून तयार केलेल्या अन्नपदार्थांचे सेवनही अतिशय मर्यादित असावे. त्याचप्रमाणे तळलेले, किंवा खूप जास्त तापमानावर शिजविलेले पदार्थही टाळले जावेत.

थायरॉईडचे वाढते प्रमाण... काय काळजी घ्याल?

आजकाल बरेच लोक थायरॉईड रोग ग्रस्त आहेत. थायरॉईडमध्ये वजन वाढण्यासह हार्मोन देखील असंतुलीत होतात. एका अभ्यासानुसार पुरषांपेक्षा महिलांमध्ये थायरॉइडचे प्रमाण जास्त आहे. याचे मुख्य कारण म्हणजे महिलांमध्ये ऑटोम्यून्यून समस्या मोठ्या प्रमाणात उद्भवते. आरोग्य तज्ञांच्या माहिती नुसार थायरॉईड संप्रेरक शरीराच्या भागांच्या सामान्य कायार्साठी आवश्यक असतात.

थायरॉईडमध्ये सामान्यतः दोन प्रकार असतात. हायपरथायरॉईडीझ आणि हायपोथायरॉईडीझ थायरॉईड हे दोन प्रकार आहेत. हायपरथायरॉईडी झममुळे ॲट्रियल फायब्रिलेशन, ऑस्टियोपोरोसिस आणि फ्रॅक्चर होऊ शकते. तर हायपोथायरॉईडीझ कोमा आणि मृत्यूचे मुख्य कारण आहे. थायरॉईड आजाराचे मूळ कारण ऑटोम्यून्यून हे आहे. ही एक आनुवंशिक समस्या आहे. ज्यामध्ये रोगप्रतिकार शक्ती एंटीबॉडीज निर्माण करते. हे थायरॉईड ग्रंथींना अधिक संप्रेरक निर्माण करण्यास उत्तेजन देते.

हायपरथायरॉईडीझ थायरॉईडची लक्षणे

- वजन कमी होणे
- गर्मी सहन न होणे.
- शांत झोप न लागणे.
- सतत तहान लागणे.
- हात-पाय थरथरणे.
- ह्यदयाचे ठोके वाढणे.
- अशक्तपणा जाणवणे.

हायपोथायरॉईडीझ थायरॉईडची लक्षणे

- सुस्तपणा, थकवा जाणवणे
- ह्यदयाचे ठोके कमी होणे
- त्वचा कोरडी पडणे
- अनियमित मासिक पाळी

थायरॉईडपासुन वाचण्याची उपाय

- रोज ३० ते ४५ मिनिटे व्यायाम केल्यास रक्ताभिसरण वाढून रक्तातील थायरॉइड शरीराच्या सर्व पेशींपर्यंत पोहोचते.
- मानसिक तणावामुळे थायरॉईडची समस्या उद्भवते, त्यामुळे जास्त तणाव घेऊ नये.
- थायरॉइड विकारांशी संबंधित लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ल्यानेच औषधोपचार सुरू करावा.

वयस्क व्यक्तींमध्ये आढळणाऱ्या अल्झायमरवर केशर उपयुक्त

वाढत्या वयाबरोबर अनेक विकारही मनुष्याच्या बाबतीत वाढीला लागतात. म्हातारपणी स्मरणशक्ती दुर्बल करणारा विकार म्हणजे अल्झायमर हा आजार. या आजाराचे प्रमाण जसजसे वाढत जाते, तशी रुग्णाची स्मरणशक्ती घटत जाते. कालांतराने स्वतःची दैनंदिन कामे कशी केली जातात याचाही रुग्णाला विसर पडतो. या विकारावर केशर उपयुक्त असल्याचा दावा नुकताच 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिग्रेटेड मेडिसिन'च्या शास्त्रज्ञांनी केला आहे.

आजकालच्या वयस्क लोकांमध्ये अल्झायमरचे वाढते प्रमाण दिसत असून, २०५० सालापर्यंत जगातील ४.५ मिलियन वृद्ध या आजाराने ग्रस्त असणार असल्याचा वैज्ञानिकांचा कयास आहे. म्हणूनच हा विकार वयस्क लोकांमध्ये कमी कसा करता येऊ शकेल या प्रश्नांवर शास्त्रज्ञ अव्याहत काम करीत आहेत. जम्मू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिग्रेटेड मेडिसीनच्या शास्त्रज्ञांना केशरामध्ये अशी काही रासायनिक तत्वे सापडली आहेत, ज्यांच्यामुळे मेंदूतील कोशिका निरोगी आणि सुदृढ राहण्यास मदत मिळत आहे. मेंदूच्या कोशिका निरोगी राहिल्याने अल्झायमर सारखे 'डीजनरेटिव्ह' आजारही दूर होण्यास मदत मिळत असल्याचे निदान शास्त्रज्ञांनी केले आहे. याबाबतीत अनेक चाचण्या आणि परीक्षणे केल्यानंतर शास्त्रज्ञांनी आपली निदाने औपचारिक रित्या जाहीर केली असून, आता केशराचा वापर करून टॅबलेट्स तयार करण्याचे काम सुरु झाले असून, या गोळ्या अंतिम परीक्षणांच्या नंतर लवकरच भारतीय औषध बाजारपेठेमध्ये उपलब्ध होणार असल्याचे समजते.

या गोळ्या चाळीस वर्षे वयाच्या पुढील लोकांसाठी असून, यंदाच्या वषार्खेर पर्यंत बाजारामध्ये उपलब्ध होणे अपेक्षित आहे. या गोळ्यांच्या सेवनाने मेंदूच्या कोशिका निरोगी राखण्यास मदत होणार असून, अल्झायमर सारखे आजार दूर ठेवता येणार आहेत.

पूर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंगांना अधिक महत्त्व

12 ज्योतिर्लिंग
अनुक्रमणिका
12 ज्योतिर्लिंग
12 ज्योतिर्लिंग नाव व ठिकाण
सोमनाथ ज्योतिर्लिंग
मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग
महाकालेश्वर ज्योतिर्लिंग
ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग
केदारनाथ ज्योतिर्लिंग
भीमाशंकर ज्योतिर्लिंग
काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग
त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग
वैद्यनाथ/वैजनाथ ज्योतिर्लिंग
औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग
रामेश्वर ज्योतिर्लिंग
घृणेश्वर ज्योतिर्लिंग
12 ज्योतिर्लिंग नाव व ठिकाण
तसं पाहायला गेलं तर देशभरात शंकर

महादेवाची अनेक मंदिरे आहेत. परंतु या मंदिरांपैकी १२ ज्योतिर्लिंगांना अधिक महत्त्व दिले जाते, कारण या १२ ज्योतिर्लिंगांची उत्पत्ती ही साक्षात शंकर महादेवांमुळे झाली आहे.

12 ज्योतिर्लिंग नाव व ठिकाण

सोमनाथ ज्योतिर्लिंग

पहिल्या क्रमांकाचे सोमनाथ ज्योतिर्लिंग हे भारताच्या गुजरात राज्याच्या वेरावळ या ठिकाणी समुद्रकिनारी स्थित आहे. या अतिप्राचीन मंदिराचे अस्तित्व २००० वर्षांहून अधिक असल्याचे मानले जाते तसेच हिंदू पुराणात या मंदिराचा उल्लेख आढळून येतो.

मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग

दुसऱ्या क्रमांकाचे मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग हे भारताच्या आंध्रप्रदेश राज्यातील श्रीशैलम या ठिकाणी स्थित आहे. या मंदिरात शंकर महादेवासोबत देवी पार्वतीची देखील पूजा केली जाते.

महाकालेश्वर ज्योतिर्लिंग

तिसऱ्या क्रमांकाचे महाकालेश्वर ज्योतिर्लिंग हे भारताच्या मध्यप्रदेश राज्यातील उज्जैन या ठिकाणी स्थित आहे. महाकालेश्वर ज्योतिर्लिंग बारा ज्योतिर्लिंगांपैकी सर्वात पवित्र ज्योतिर्लिंग मानले जाते.

ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग

चौथ्या क्रमांकाचे ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग हे भारताच्या मध्यप्रदेश राज्यातील खंडवा या ठिकाणी स्थित आहे. हे ज्योतिर्लिंग नर्मदा नदी काठावर वसले आहे.

केदारनाथ ज्योतिर्लिंग

पाचव्या क्रमांकाचे केदारनाथ ज्योतिर्लिंग हे भारताच्या उत्तराखंड राज्यातील केदारनाथ या ठिकाणी स्थित आहे. केदारनाथ ज्योतिर्लिंग हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक तसेच छोटा चार धाम पैकी एक धाम म्हणून ओळखले जाते.

भीमाशंकर ज्योतिर्लिंग

सहाव्या क्रमांकाचे भीमाशंकर ज्योतिर्लिंग हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यामध्ये भीमाशंकर या ठिकाणी स्थित आहे.

काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग

सातव्या क्रमांकाचे काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग हे भारताच्या उत्तरप्रदेश राज्यातील वाराणसी या ठिकाणी स्थित आहे.

त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग

आठव्या क्रमांकाचे त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील नाशिक या ठिकाणी स्थित आहे.

वैद्यनाथ/वैजनाथ ज्योतिर्लिंग

नवव्या क्रमांकाचे वैद्यनाथ/वैजनाथ ज्योतिर्लिंग हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील परळी या ठिकाणी स्थित आहे. या ज्योतिर्लिंगाला परळी वैजनाथ म्हणून ओळखले जाते.

औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग

दहाव्या क्रमांकाचे औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील हिंगोली या ठिकाणी स्थित आहे.

रामेश्वर ज्योतिर्लिंग

अकराव्या क्रमांकाचे रामेश्वर ज्योतिर्लिंग हे भारताच्या तामिळनाडू राज्यातील रामनाथपुरम या ठिकाणी स्थित आहे.

घृणेश्वर ज्योतिर्लिंग

सर्वात शेवटचे आणि बाराव्या क्रमांकाचे घृणेश्वर ज्योतिर्लिंग हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद या ठिकाणी स्थित आहे.

दैनिक लोकरक्षणाय सुडोकू - २५

2	5				6	1		8
7				8			9	
				3			6	
9		2		6	3			
3	7	4	5			6	8	
1								9
4		9	1			8	2	
		8	6	4	2			3
								1

उत्तर सुडोकू -२४

2	5	3	1	6	8	4	7	9
9	7	1	2	4	5	6	8	3
6	4	8	7	9	3	5	1	2
4	6	2	3	8	1	7	9	5
5	1	7	4	2	9	8	3	6
3	8	9	5	7	6	1	2	4
7	3	5	6	1	2	9	4	8
8	2	4	9	5	7	3	6	1
1	9	6	8	3	4	2	5	7

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

दिनविशेष

७ मार्च

- १८७६: अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांना टेलिफोनचे पेटंट मिळाले.
- १९३६: दुसरे महायुद्ध झ्र व्हर्सायचा तह धुडकावून जर्मनीने हाईनलँडमधे सैन्य घुसवले.
- २००६: लष्कर-ए-तैय्यबा या आतंकवादी संघटनेने वाराणसी येथे बॉम्बस्फोट घडवून आणले.
- २००९: केपलर स्पेस ऑब्झर्व्हेटरी या संशोधन संस्थेची स्थापना.
- १७६५: फोटोग्राफी चे शोधक निसेफोरे नाऐप्से यांचा जन्म. (मृत्यू: ५ जुलै १८३३)
- १७९२: ब्रिटिश गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ, रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचा संस्थापक सर जॉन विल्यम हर्षेल यांचा जन्म. (मृत्यू: ११ मे १८७१)
- १८४९: महान वनस्पतीतज्ञ ल्यूथर बरबँक यांचा जन्म. (मृत्यू: ११ एप्रिल १९२६)
- १९११: ज्ञानपीठ पुरस्कार विजिते आधुनिक हिंदी साहित्यिक आणि वृत्तपत्रकार सच्चिदानंद हिराचंद वात्सायन यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १९८७ झ्र नवी दिल्ली)
- १९१८: मराठी साहित्यिक स्नेहलता दत्तात्रय दसनूरकर यांचा जन्म.
- १९३४: भारताचा यष्टिरक्षक नरी कॉन्ट्रॅक्टर यांचा जन्म.
- १९४२: भारतीय क्रिकेटपटू उमेश कुलकर्णी यांचा जन्म.
- १९५२: वेस्ट इंडियन क्रिकेटपटू व्हिव्हियन रिचर्डस यांचा जन्म.
- १९५५: चित्रपट अभिनेते अनुपम खेर यांचा जन्म.
- १६४७: छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरू दादोजी कोंडदेव यांचे निधन.
- १९२२: रंगभूमी नट गणपतराव जोशी यांचे निधन. (जन्मः १५ ऑगस्ट १८६७)
- १९५२: तत्वज्ञ परमहंस योगानंद यांचे निधन.
- १९६१: भारतरत्न पंडित गोविंदवल्लभ पंत यांचे निधन. (जन्मः १० सप्टेंबर १८८७)
- १९७४: माजी अर्थमंत्री टी. टी. कृष्णमाचारी यांचे निधन.
- १९९३: माहितीपट निर्मितीचे आद्य प्रवर्तक इर्झा मीर यांचे निधन. (जन्मः २६ ऑक्टोबर १९००)
- २०००: कथालेखक प्रा. प्रभाकर तामणे यांचे निधन. (जन्मः २९ ऑक्टोबर १९३१)

भविष्य

मेष तुमचा इतरांवर प्रभाव राहील. व्यवसायात नवीन तंत्र व मंत्र अंमलात आणू शकाल. वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

वृषभ महत्त्वाची कामे दुपारनंतर मार्गी लागतील. आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील.

मिथुन वाहने जपून चालवावीत. अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

कर्क राजकीय क्षेत्रात सहभागी व्हाल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. तुमच्या कार्यक्षेत्रात मानसन्मान, प्रतिष्ठा लाभेल. शासकीय कामे मार्गी लागतील. खर्चाचे प्रमाण वाढेल.

सिंह एखादी गुप्त वार्ता समजेल. हितशत्रुंचा त्रास संभवतो. राजकीय व सामाजिक क्षेत्रात सहभागी व्हाल. मानसन्मान व प्रतिष्ठा लाभेल. भागीदारी व्यवसायातील निर्णय मार्गी लागतील.

कन्या मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील. खर्चाचे प्रमाण वाढेल. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.

तुला प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वादविवाद टाळावेत. इतरांच्या सहकायार्ची अपेक्षा नको. एखादी महत्त्वाची वार्ता समजेल.

वृश्चिक जिद्दीने कार्यरत रहाल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल. वरिष्ठांबरोबर मतभेदाची शक्यता. महत्त्वाची कामे रखडण्याची शक्यता. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल.

धनु आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. मनोबल उत्तम राहील. वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी. नोकरी, व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील.

मकर आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभेल. उत्साह व उमेद वाढविणारी एखादी घटना घडेल. आरोग्य उत्तम राहील. वेळ व पैसा वाया जाण्याची शक्यता.

कुंभ काहींना कामाचा ताण व दगदग जाणवेल. मानसिक अस्वस्थता जाणवेल. अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाचे पत्रव्यवहार पार पडतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

मीन मित्रमैत्रिणींचा सहवास लाभेल. महत्त्वाचे पत्र व्यवहार पार पडतील. वादविवाद टाळावेत. शासकीय क्षेत्रात सुसंधी लाभेल. तुमचे कार्यक्षेत्र वाढणार आहे. मनोरंजनाकडे कल राहील. प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pra[illegible] ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

'अधिक समानां'ना दणका

लोकशाही ही लोकप्रतिनिधींच्या सद्सद्विवेकबुद्धीने, निर्भय आणि निष्पक्ष वातावरणात घेतलेल्या निर्णयाने बळकट होत असते. पण त्या गोष्टींचा अभाव असेल तर अनेक प्रश्न निर्माण होतात. ह्यसंसदीय विशेषाधिकाराच्या माध्यमातून लाचखोरीला संरक्षण मिळू शकत नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने निखळपणे नमूद करत लोकशाही मूल्यांबाबतची तडजोड आणि सौदेबाजी अमान्य केली, हे त्यामुळेच महत्त्वाचे आहे. खासदार, आमदार यांना अनुक्रमे राज्यघटनेच्या कलम १०५(२) आणि कलम १९४ (२) नुसार दिलेले हक्क म्हणजे मनमानी वर्तनाचा परवाना नव्हे. विशेषाधिकाराच्या वापराला आणि त्याच्या ढालीलादेखील तितकेच सबळ कारण गरजेचेच आहे. कायद्यासमोर सर्व समान असतात , हेच तत्त्व श्रेष्ठ आहे. पण सर्वजण समान असले तरी काही जण स्वतःला अधिक समान मानतात, यावर भेदक भाष्य करणाऱ्या जॉर्ज ऑर्वेलची उक्ती यासंदर्भात आठवते. आपल्याकडील अशांना ताळ्यावर आणणाऱ्या निर्णयाचे त्यामुळेच स्वागत केले पाहिजे. सभागृहातील कामकाजात किंवा राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यसभा यांच्या निवडणुकांवेळच्या मतदानाच्यावेळी होणारी लाचखोरी किंवा मतांसाठी केली जाणारी देवाणघेवाण आक्षेपार्ह असून, विशेषाधिकाराच्या ढालीआडून ते खपवून घेतले जाणार नाही, हेही स्पष्टपणे नमूद केले. हा निर्णय राजकारणाच्या शुद्धीकरणाला बळ देणारा आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने हा निकाल देतानाच २८ वर्षांपूर्वीची, १९९८ मधील गाजलेल्या झारखंड मुक्ती मोचार्चे तत्कालीन नेते शिबू सोरेन यांच्यासह सातजणांच्या मतांसाठी लाच या गाजलेल्या प्रकरणात दिलेल्या निकालाला रद्दबातल ठरवले आहे. १९९३ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखालील सरकारवरील अविश्वास ठरावावेळी मतांसाठी लाच घेतल्याचा आरोप झारखंड मुक्ती मोर्चाच्या सात खासदारांसह दहा जणांवर झाला होता. त्यावेळी नरसिंहराव सरकार तरले; पण लाचखोरीने भारतीय राजकारणाला बट्टा लागला. संसदीय कामकाजातील या सौदेबाजीने लोकशाहीची लक्तरे वेशीवर टांगली गेली. राज्यसभा निवडणुकांच्या निमित्ताने होणाऱ्या देवाणघेवाणी, तडजोडी, आश्वासने आणि आणाभाका या नवीन नाहीत. काही दिवसांपूर्वी झालेल्या राज्यसभेच्या सत्तरवर जागांच्या निवडणुकीवेळीही त्याचे घृणास्पद चित्र जनतेने पाहिले आहे. अशाच २०१२ मधील राज्यसभा निवडणुकीवेळी मतासाठी लाच घेतल्याचा आरोप झारखंड मुक्ती मोर्चाच्या सीता सोरेन यांच्यावर झाला होता. केंद्रीय अन्वेषण विभागाने त्यांच्याविरोधात लाचखोरीबद्दल आरोपपत्र दाखल केले. त्यावेळी सोरेन यांनी घटनेतील विशेषाधिकाराची ढाल पुढे करत खटला रद्द करण्याची मागणी उच्च न्यायालयात केली. २०१९मध्ये हेच प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोचले. त्यावेळी तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या खंडपीठाने प्रकरण सात न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे सोपवले. त्यावर आता घटनापीठाने दूरगामी परिणाम करणारा निकाल दिला आहे. भ्रष्टाचार आणि लाचखोरीने लोकशाही मूल्यांना सुरुंग लागतो. लोकप्रतिनिधी विवेकापेक्षा सारासार विचार गमावून देवाणघेवाणीला महत्त्व देतात, आपल्या घटनादत्त कर्तव्याशी तडजोड करतात, प्रतारणा करतात, ही बाब मतदारांच्या हिताआड येते. त्यांच्याविषयीच्या बांधिलकीच्या तत्त्वाला त्यामुळे तडा जातो. राजकारणाचे बाजारीकरण होऊन लोकशाही मूल्यांची घसरण होते, या बाबींवर यानिमित्ताने पुन्हा प्रकाश पडला आहे. अर्थात १९९८च्या निकालानंतरही मतांसाठी लाचेचे प्रकार कितीतरी घडले आहेत. थोडक्यात, ज्या जनतेने निवडून दिले, तिच्या हितापेक्षा स्वहिताला प्राधान्य देत राजकारण्यांचे सौदेबाजीचे उद्योग सुरूच होते. २०१५ मध्ये तेलुगू देसम पक्षाच्या आमदाराला मतासाठी लाच देत असताना पकडून कारवाई केली होती. त्याला तुरुंगवासही झाला होता. लोकप्रतिनिधींना निष्पक्षपणे, निर्भय वातावरणात, विवेकबुद्धीला स्मरून संसदेत किंवा विधिमंडळात कामकाज करता यावे, त्यांच्या निर्णयप्रक्रियेवर कोणत्याही अप्रिय घटकांचा प्रभाव राहू नये, जेणेकरून जनहिताला प्राधान्य मिळेल, या उदात्त हेतूने खरे तर घटनाकर्त्यांनी राज्यघटनेमध्ये १०५ (२) आणि १९४ (२) या कलमांची तरतूद केली होती. तथापि, त्याचा लोकप्रतिनिधींकडून होणारा गैरवापर ही चिंतेची बाब आहे. विशेषाधिकार म्हणजे आम जनतेपेक्षाही आपण कोणीतरी विशेष आहोत, ही भावना लोकशाहीच्या पाईकांमध्ये बळावणे आणि त्याआड दडत लोकशाही मूल्यरक्षणाच्या कर्तव्याला त्यांनीच बगल देणे, हेच मुळी लोकशाहीच्या तत्त्वामध्ये न बसणारे आहे. त्याचीदेखील जाणीव न्यायालयाने या निकालाच्या निमित्ताने लोकप्रतिनिधींना करून दिली, हेही बरे झाले. एकीकडे लोकशाहीचा उदोउदो करायचा, तिचे गोडवे गायचे आणि दुसरीकडे तिच्याच पालनकर्त्यांनी दलालीतून स्वतःचे उखळ पांढरे करायचे, हे कुठल्या नीतीमत्तेत बसते? न्यायालयाने निकाल देताना केवळ मतांचा बाजारच नव्हे; तर सदस्याच्या सभागृहातील कामकाजातील सहभाग, भाषणे आणि कृतीतूनही अशा लाचखोरीचा वास आला तर त्यालाही विशेषाधिकाराचे कवच मिळू शकत नाही, हे स्पष्ट करत एका अर्थाने राजकारणाच्या शुद्धीकरणाला हातभार लावला आहे. अर्थात, तळमळीने लोकांचे प्रश्न सभागृहात मांडणाऱ्या लोकप्रतिनिधींना बळही देण्याचा प्रयत्न न्यायालयाने केला आहे. विशेषाधिकार निश्चितीची दोन टप्प्याची चाचणी न्यायालयाने निकालात नमूद केली आहे. तेही लोकशाही सुदृढतेचे लक्षण मानले पाहिजे.

आशियाचे वाढते महत्त्व आणि व्यापारवाढीच्या संधी

पुण्यात आशिया आर्थिक परिषद नुकतीच भरवली गेली. परराष्ट्र मंत्रालय व पुणेस्थित विचारमंथन केंद्र पुणे इंटरनॅशनल सेंटरतर्फे आयोजित परिषदेत आशिया खंडातील १० देशांच्या विचारवंतांनी सहभाग नोंदविला.पुण्यात आशिया आर्थिक परिषद नुकतीच भरवली गेली. परराष्ट्र मंत्रालय व पुणेस्थित विचारमंथन केंद्र पुणे इंटरनॅशनल सेंटरतर्फे आयोजित परिषदेत आशिया खंडातील १० देशांच्या विचारवंतांनी सहभाग नोंदविला. सहभागी ४६ तज्ज्ञांनी वेगवेगळ्या चर्चासत्रांत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. त्यातील काही निवडक विचारांचे संकलन.अठराव्या शतकात पश्चिमात्य देशांत औद्योगिक क्रांती घडली आणि याच काळापासून आधुनिक इतिहासाची सुरुवात झाली. तेव्हापासून आजपर्यंत भारत आणि आशियातील इतर देश हे पाश्चिमात्य देशांकडे भूतकाळातील प्रगतीसोबतच भविष्यकाळातील प्रगतीचे केंद्र म्हणून पाहत आहेत. आजही तंत्रज्ञान व नावीन्याच्या जोरावर अमेरिका व इतर पाश्चिमात्य हे आशियातील इतर देशांच्या मैलभर पुढे आहेत. मात्र, मागच्या दशकात आर्थिक आकडेवारी पाहता, जागतिक पातळीवर वाढत असलेले आशिया खंडाचे महत्त्व अधोरेखित होते. आशिया खंडात भारत, चीन, जपान, बांगलादेश, श्रीलंका असे ५० विविध देश आहेत. जगभरातील प्रत्येक शंभरपैकी साठ लोक आशिया खंडात राहतात. मागील काहीं वर्षातील आर्थिक प्रगती पाहता, जगातील प्रत्येक १०० रुपयांच्या वार्षिक सकल उत्पन्नात (जीडीपी) आशिया या एकट्या खंडाचे ५७ रुपये (५७%) योगदान आहे. जगातील १०० मध्यमवर्गीयांपैकी ५६ मध्यमवर्गीय आशिया खंडात राहतात. जागतिक पातळीवरील बदलांमुळे पाश्चिमात्य देशांसोबतच आता आशिया खंडातील देशांसोबतही आपले राजकीय व आर्थिक व्यवहार कसे सुधारत आहेत, याला महत्त्व प्राप्त होते. या पार्श्वभूमीवर ही परिषद झाली. परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी उद्घाटनाच्या भाषणात सांगितले की, जागतिकीकरणाच्या युगामुळे निर्माण झालेल्या विशिष्ट आर्थिक कठोरतेमुळे जग विविध क्षेत्रातील मर्यादित पुरवठादारांवर अवलंबून आहे आणि हे परावलंबन धोकादायक आहे.या विधानाने, कोरोनाकाळात झालेला सेमीकंडक्टर, कार्गो कंटेनर अशा विविध वस्तूंचा तुटवडा आणि चीनने आडमुठेपणाने कारखाने बंद केल्याने मोडलेली जागतिक पुरवठा साखळी व त्यामुळे वाढलेली महागाई या घटना आठवतात. जागतिक अर्थव्यवस्थेत स्थिरता आणण्यासाठी पुरवठ्याचे अधिक पर्याय निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. असे पर्याय निर्माण करण्यासाठी, जागतिक पातळीवर अधिक आंतरराष्ट्रीय सहयोग अपेक्षित आहे व असे सहयोग घडवून आणण्यात "आशिया आर्थिक परिषद" त्यात महत्त्वपूर्ण वाटा उचलत आहे, असंही त्यांनी नमूद केलं. व्यापारवाढीच्या दिशेने... भारताचे नेतृत्व असलेल्या दक्षिण आशिया खंडात बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ व भूतान हे आर्थिक व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे देश. दक्षिण आशियातील देशांतर्गत व्यापार हा फक्त ४० अब्ज डॉलरइतकाच आहे व येत्या काही वर्षात विशेषतः वाहनउद्योग, वस्त्रोद्योग व रसायने या क्षेत्रात तो वाढण्याची संधी आहे.या संधीचे सोने करायचे असेल तर भारताने सही केलेल्या दक्षिण आशियातील विविध अंतदेर्शीय व्यापार करारात जीव फुंकायला लागेल. यासोबतच उत्तर पूर्व राज्यांतील रस्ते, रेल्वे व ऊर्जा प्रकल्पांवरील गुंतवणूक वाढवायला हवी. भारतीय उद्योजकांनी पाश्चिमात्य देशांसोबतच या पूर्वी देशासोबतचा व्यापार वाढवायला हवा.मागच्या वर्षीच्या सप्टेंबर मध्ये जी-२० च्या पार्श्वभूमीवर एका शिखर परिषदेत भारतीय मध्य पूर्व महामार्ग-आयएमइसी ची संकल्पना मांडली गेली. अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटली, इस्राईल, आखाती देश व भारत या देशांनी आयएमइसीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

साधारणतः एक लाख ६५ हजार कोटी रुपयांच्या खर्चाने बांधल्या जाणाऱ्या ४८०० किमी लांब पल्ल्याचा या महामार्गावर एका बाजूला भारत आखाताशी समुद्रमार्गे जोडला जाईल व दुसऱ्या बाजूला सौदी अरेबियाच्या अल-हदीथ आणि इस्राईलच्या हैफा बंदरामार्गे पायरस या युरोप (ग्रीक) मधल्या बंदराशी जोडला जाईल. या महार्गावर समुद्र, रेल्वे व परत समुद्रमार्ग असे टप्पे असतील. या महामागार्मुळे भारत व (पश्चिम आशियाद्वारे) युरोपमधील दळणवळणाचा वेळ ४०टक्के कमी होईल, तर खर्च ३०टक्क्यांनी कमी. साहजिकच याचा मोठा फायदा भारताला खंडातील आपल्या पश्चिमेला असलेल्या देशांसोबतचा व्यापार वृद्धिंगत करण्यासाठी होणार आहे. आज इस्राईल व हमासमध्ये चालू असेलेल्या गाझा पट्टीतील युद्धामुळे आयएमइसीच्या अंमलबजावणीची गती एकदमच मंदावली आहे. मात्र येत्या काळात परिस्थिती सुधारेल व आयएमइसीच्या पायाभूत सुविधा बांधणीला गती येईल, असा अपेक्षांचा सूर या चर्चासत्रात होता. या महामागार्ची तुलना चीनच्या "बेल्ट आणि रोड" या उपक्रमाशी होते. मात्र यात खूप वेगळेपण आहे. 'बेल्ट आणि रोड" हा चीनचा स्वतःच्या गरजेसाठी बनवलेला उपक्रम आहे मात्र आयएमइसीचा हा उपक्रम भागीदार देशांच्या सामूहिक निधीतून, योगदानातून सर्व भागीदार देशांच्या गरजांची जाणीव ठेवून बनणारी आहे. असे महत्त्वाकांक्षी कॉरिडॉर बांधणे हे धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे आहेच, मात्र त्यासोबतच आशिया खंडातील व इतर देशांसोबत व्यापार वाढवण्यासाठी आणखी एक महत्त्वाचा घटक आहे आणि तो म्हणजे "व्यापार करार".भारताला अनेक मुक्त व्यापारी कराराचा भाग बनणे महत्त्वाचे आहे. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात चीनने जागतिक व्यापार संघटनेचा मोठा फायदा उचलला. मात्र मागच्या काही वर्षांपासून डब्लूटीओ अकार्यक्षम बनली आहे. एका बाजूला डब्लूटीओ पूर्ववत चालणे भारतासाठी खूप फायदेशीर ठरणार आहे, तर दुसरीकडे ते तसे होईलच याची शाश्वती नसल्याने युरोप, ब्रिटन अशा देशांसोबत "मुक्त व्यापार करार यावरही लवकर वाटाघाटी करायला हव्यात. अशा वाटाघाटींमध्ये तरबेज असलेल्या पाश्चिमात्य देशांप्रमाणे भारतानेही या क्षेत्रातील वाटाघाटी करणा ्या निष्णात तज्ज्ञांचे मनुष्यबळ वाढवायला हवे. या परिषदेत, भारताचा आशिया देशांसोबतचा व्यापार आणि व्यापार करारांवर आवश्यक असलेली प्रगती यासोबतच उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्राचे परिणाम यावरही विचारमंथन झाले. यात उत्पादकक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन व इलेक्ट्रिक वाहने अशा विषयांचा समावेश होता.

विचारमंथनाचे माहात्म्य ही चर्चा पीआयसी च्या यू ट्यूबवर आहे. अशा परिषदांच्या माध्यमातून जगभरातून जमलेल्या ४०-४५ वक्त्यांशी व इतर विचारवंतांशी हितगुज करणे ही सुवर्णसंधीच. अशी विचारसत्रे नागरिकांना जागरूक बनवितात आणि हे जागरूक व सक्षम लोकशाहीसाठी महत्त्वाचे आहे. प्रगत देशांमध्ये अशी अनेक चर्चासत्रे भरवली जातात. भारतातही आता ते होऊ लागले आहे. 'आशिया आर्थिक परिषद" ही त्यापैकीच एक. परराष्ट्र मंत्रालयाच्या मदतीने भरविली गेलेली ही परिषद पुण्यात आयोजित केली गेली हेही विशेषच. या परिषदेमुळे, शहरातील व परिसरातील विचारवंत, प्राध्यापक, विद्यार्थी व वार्ताहर हे दहा आशिया देशांचे प्रतिनिधी व देशभरातून जमलेले इतर विचारवंत यांच्याशी संवाद साधू शकले. वारंवार अशी चर्चासत्रे दिल्ली, मुंबईबरोबरच देशाच्या इतर शहरांतही घडत राहाणे महत्त्वाचे. पुण्यात अशा चर्चासत्रांचे आयोजन करणे हे "पुणे विचारमंथन केंद्राचे" (पुणे इंटरनॅशनल सेन्टर) महत्वाचे उद्दिष्ट असेल.

भिवंडीत बांधकाम व्यावसायिकाची ९ कोटींची फसवणूक

चार जणांविरोधात गुन्हा दाखल

भिवंडी : भिवंडीत भागीदारीत व्यवसाय करण्यासाठी दीड कोटी रुपये घेऊन परस्पर दुसऱ्या सोबत भागीदार करार करून व्यावसायिकाची ९ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.या प्रकरणी पोलिसांनी चार जणांविरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मे.ब्राईट बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचे मालक रणमल जुगराज विरवाडीयार,जितेंद्र रणमल विरवाडीयार,रोहीत रणमल विरवाडीयार,सपना जितेंद्र विरवाडीयार यांच्या मालकीची अंजुरफाटा येथे मधुसुदन कंपाउंड व श्रीराम कंपाउंड या नावाने जमीन आहे.या जमिनीवर बांधकाम प्रकल्प उभा करण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाची व आर्थिक गुंतवणूक करणाऱ्याची गरज असल्याचे भासवून प्रकाश विमलचंद यांना गळ घालत ५० टक्के भागीदारी व राजेश सुरजमल शहा यांना २२.५० टक्के इतक्या भागीदारीने भागीदारी पत्र बनवून सोबत घेतले.

त्यानुसार प्रकाश विमलचंद यांनी दीड कोटी रुपयांची गुंतवणूक केल्यानंतर ब्राईट बिल्डर्स अँड डेव्हलपर्सच्या चारही मालकांनी प्रकाश विमलचंद व राजेश शहा यांना कोणत्याही प्रकारची पूर्वसुचना अगर नोटीस न देता नवीन भागीदार म्हणून आपल्या सुनेचे नाव समोर आणून नावे भागीदारपत्र बनविले.

◆तर मधुसुदन कंपाउंड मधील गाळे व जमीन अधिकारा शिवाय कोणतीही परवानगी अथवा संमती न घेता विक्री करून नऊ कोटी रुपयांचा नफा करून आर्थिक फसवणुक केली.

◆याप्रकरणी प्रकाश विमलचंद यांनी दिलेल्या तक्रारीवरून नारपोली पोलिसांनी ब्राईट बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचे मालक रणमल जुगराज विरवाडीयार,जितेंद्र रणमल विरवाडीयार,रोहीत रणमल विरवाडीयार,सपना जितेंद्र विरवाडीयार यांच्या विरोधात फसवणूकीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

जमिनीच्या वादातून किराट गावात तुफान हाणामारी

▌पोलिसांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप ▌गुंडांकडून ग्रामस्थांना मारहाण

बोईसर : शांत असलेल्या किराट गावात अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न मनोर पोलिसांच्या सहकार्याने गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून सुरू असल्याचा आरोप किराटच्या ग्रामस्थांनी केला आहे. कौटुंबिक कलहातील जमीन ताब्यात घेण्यासाठी एका पक्षाने गावाबाहेरील गुंडांच्या मदतीने गावातील महिलांसह ज्येष्ठ ग्रामस्थांना मारहाण करीत चारचाकी वाहनांची तोडफोड केल्याचा आरोप करण्यात येत आहे. शनिवारी घडलेल्या या घटनेची माहिती मनोर पोलिसांना दिल्यानंतरही त्यांनी घटनास्थळी भेट दिली नाही, गुन्हा दाखल केला नाही, असे ग्रामस्थांचे म्हणणे असून, यामुळे गावात संतापाचे वातावरण आहे. ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केल्यानंतर मंगळवारी किराट ग्रामपंचायत सभागृहात उपविभागीय पोलीस अधिकारी नीता पाडवी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

किराट गावातील गायकवाड कुटुंबातील जमिनीच्या ताब्याचा वादात पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे वाद चिघळला. पोलीस पोहोचले नसल्याने वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. कायदा व सुव्यवस्था राखण्यात मनोर पोलीस अपयशी ठरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. किराट गावातील गायकवाड कुटुंबातील जमिनीचा वाद आहे. शनिवारी दुपारी जमिनीचा ताबा घेण्यासाठी गुंड दाखल झाले होते. ताबा घेण्यासाठी एका बाजूजे विरोध झाल्याने वाद निर्माण झाला होता.

> "जमिनीचा वाद ही दिवाणी बाब असली तरीही पोलीस बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही. किराट गावात झालेल्या हाणामारीची प्रकरणी पोलिसांच्या भूमिकेची चौकशी केली करून, दोषी आढळल्यास अहवाल पोलीस अधीक्षकांना पाठवण्यात येईल. गावाबाहेरील आलेल्या व्यक्तींची माहिती घेतली जात आहे. योग्य ती कारवाई केली जाईल.
>
> **- नीता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर**

Thane cloth merchant duped of over Rs 1 crore by four of family from Gujarat

Mumbai:

Four members of a family from Gujarat allegedly cheated a powerloom owner and merchant from Bhiwandi in Maharashtra's Thane district of Rs 1.06 crore, police said on Wednesday. Based on a complaint filed by the 45-year-old victim, the police have registered a case under Indian Penal Code (IPC) sections 420 (cheating), 406 (criminal breach of trust), 504 (intentional insult), 506 (criminal intimidation) and 34 (common intention), they said. The accused were identified as Popatlal Khaini, his two sons Shailesh and Manoj along with a woman family member, a police official said. This family purchased a large quantity of grey cloth from the victim, but failed to pay Rs 1,06,30,000 to him despite repeated reminders from his side, senior inspector Mahadeo Kumbhar of Bhiwandi town police station said. Meanwhile, police has registered an FIR against a father-son duo under the bonded labour system Act for allegedly confining a family of six to their brick kiln in Palghar district, an official said on Wednesday. No arrest has been made in the case which was registered on Tuesday against Pundalik Patil and his son Chetan

Rs 3,600 crore drug haul: ED seeks details of accused from Pune Police

Mumbai :

The Enforcement Directorate (ED) has sought details of the persons arrested by Pune police in Maharashtra in the last month's mephedrone drug haul case, a senior official said, reported news agency PTI.The city police in February seized more than 1,700 kilograms of mephedrone, valued at about Rs 3,600 crore in illicit markets, across Pune, Delhi and Sangli, reported PTI.Eleven persons, including the owner of a manufacturing unit in Kurkumbh MIDC (near Pune), where the contraband was allegedly produced, were apprehended.

"We received a letter from the ED on Monday, seeking information about the accused. Given the magnitude of the drug racket, it was expected that the ED would seek details," the crime branch official said on Tuesday, reported PTI. The central agency asked for information about the accused, their bank accounts and locations where searches were conducted. "Based on the information, the agency will investigate money trails and suspected hawala transactions involving the accused," he said, reported PTI. The police have arrested 11 persons in the case so far, with five now in judicial custody and six in police custody.

"Four suspects, including mastermind Sandip Dhunay who has fled the country, are wanted in the case," the official said, reported PTI. Meanwhile, to avoid potential law and order incidents, the Pune Police have issued an order instructing bars and permit rooms to close at 1:30 am. The order, issued on Monday under Section 144 of the Criminal Procedure Code (CrPC), is in response to reports of unruly behaviour in and around bars, permit rooms, and restaurants, which have generated concerns about public order, reported news agency PTI.

Fire destroys wallpaper godown in Palghar; no casualty

Palghar:

A major fire broke out at wallpaper godown in Palghar, an official said on Wednesday, reported news agency PTI. There was no casualty in the blaze which erupted at around 7 pm on Tuesday in the godown located in Boisar industrial area of Tarapur where some chemical units are also in the vicinity, Palghar district disaster management cell chief Vivekanand Kadam told PTI. Four fire engines were rushed to the spot and the fire was brought under control at around 2 am on Wednesday, the official said, reported PTI. The wallpaper godown in Palghar, where polyvinyl chloride (PVC) wallpapers and carpets were kept, was completely destroyed, he said, reported PTI. Cooling operations were underway and a probe was on into the cause of the fire, the official said. In another incident, a fire broke out at the Turbhe bus depot in Navi Mumbai on Tuesday, said authorities, reported ANI.

Many buses parked at the depot were seen engulfed in the fire.Upon receiving the information, firefighters rushed to the spot.The details about the extent of the destruction caused by the fire or whether there were any casualties involved are yet to be known, reported ANI. The authorities are also investigating the cause of the fire. More information is awaited.Earlier, a fire Brigade official said a phone call received about a "blaze" in a Mumbai high-rise residential building housing staffers of a Maharashtra government-run hospital in south Mumbai turned out to be a false alarm as no such incident had taken place, reported news agency PTI. The official said they have asked the Mumbai police to take action against the unidentified person for raising a false fire alarm and causing panic, reported PTI.He said the person at around 8.45 pm told them there was a "short circuit" in a flat on the 14th floor of the Mumbai high-rise residential building housing staffers of state government-run GT Hospital, reported PTI.

रिपब्लिकन सेनेचा मोर्चा

■ **भिवंडी** : संकेत भोसले हत्याकांडाच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी शहरातील कामतघर ते उपविभागीय कार्यालयावर भव्य जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारो महिला,नागरिक व युवक सहभागी झाले होते. यावेळीप्रांताधिकारी यांना हत्याकांडातील आरोपींवर कडक कारवाई करावी याबाबत निवेदन देण्यात आले.१४ फेब्रुवारी रोजी भिवंडीतील कामतघर भागातील वराळदेवी येथे राहणारा संकेत भोसले या शालेय विद्यार्थीस बेदम मारहाण झाली होती. या मारहाणीत केईएम रुग्णालयात मृत्यू झाला होता.

टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ **नालासोपारा** : विरार पूर्वेकडील नारंगी फाटा येथे रस्त्यात उभ्या असलेल्या दुचाकीस्वाराला पाठीमागून टँकरने धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी टँकर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवारी सायंकाळी नारंगी फाटा येथे शैलेश कोरगावकर (३२, रा. विरार) रस्त्याच्या बाजूला उभा होता. इतक्यात टँकरने धडक दिल्याने तो मागच्या चाकाखाली आल्याने त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी विरार पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला आहे.

तीन दिवसांत १७ लाखांचा नफा

■ **ठाणे** : जिल्हा परिषद ठाणे मार्फत उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत विभागीय स्तरावरील आयोजित करण्यात आलेल्या ''विभागीय मिनी सरस व जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री'' ला तीन दिवसात नागरिकांनी चांगली गर्दी करून विविध वस्तूंची खरेदी केली. त्यामुळे १७ लाख, ५३ हजार, १३५ रुपये नफा महिला बचत गटांना झाला असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांनी दिली.हे प्रदर्शन १ मार्च ते ३ मार्च या कालावधीत धर्मवीर आनंद चिंतामणी टॉवर मैदान, ठाणे येथे आयोजित करण्यात आले होते.

घरफोडीच्या दोन घटना, १७ गठ्ठे चोरीस

■ **भिवंडी** : पूर्णा ग्रामपंचायत हद्दीतील एका गोदामासह घरात चोरट्यांनी चोरी करून सुमारे पावणेचार लाखांचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिवंडी-ठाणे महामार्गावरील पूर्णा गावाच्या हद्दीतील खंडागळे इस्टेट येथे असलेल्या पवन फ्रंट कॅरियर्स कंपनीचे गोदाम आहे. या ठिकाणी रात्रीच्या अंधारात गोदामाचे शटर उचकटून चोरट्यांनी गोदामात ठेवलेले २ लाख ४८ हजार २०० रुपये किमतीचे सियाराम सिल्क मिल लि. कंपनीचे कपड्याचे एकूण १७ गठ्ठे चोरी केल्याचे उघडकीस आले आहे.

गोदामाला आग

■ **बोईसर** : तारापूर औद्योगिक वसाहतीमधील गोदामाला मंगळवारी सायंकाळी ७ च्या सुमारास आग लागली. औद्योगिक वसाहती मधील एन झोनमधील ऑक्टो कंपनीच्या वॉल पेपरच्या गोडाऊनला सर्वप्रथम आग लागली होती. नंतर ऑक्टो इंटरियल कंपनीदेखील आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. तारापूर औद्योगिक महामंडळाच्या अग्निशमन दलाचे दोन बंब घटनास्थळी दाखल झाले आहे. जवानांच्या माध्यमातून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आगीचे कारण समजू शकले नाही. ज्वलनशील फायबर शीटसारख्या वस्तूंचा साठा असल्याने आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी वेळ लागण्याची शक्यता अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

टपऱ्या, फेरीवाल्यांवर कारवाई

■ **नालासोपारा** : मुंबई-अहमदाबाद महामार्ग आणि वसई विरार महापालिकेच्या हद्दीतील होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वसई विरार पालिका आणि मीरा भाईंदर आयुक्तालयातील पोलिसांनी संयुक्तरीत्या कारवाई करून ५० ते ६० अनधिकृत टपऱ्या, फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली आहे. गेले काही दिवस वाहनकोंडीने नागरिक त्रस्त झाले होते. त्याची दखल खा. राजेंद्र गावित यांनी मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात बैठक घेऊन निर्देश दिले होते.

फॉरेक्स ट्रेडिंग व क्रिप्टो ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून फसवणूक

दुक्कल गजाआड

देशभरातील ११५ सायबर गुन्ह्यांत या टोळीचा सहभाग असल्याचे उघड

सायबर टोळीच्या बँक खात्यातील ३९ लाख गोठवण्यात पोलिसांना यश

■ **नवी मुंबई** : कळंबोलीतील एका व्यावसायिकाला फेसबुकद्वारे संपर्क साधून फॉरेक्स ट्रेडिंग व क्रिप्टो ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून त्यांच्याकडून तब्बल ६० लाख २३ हजार रुपये उकळणाऱ्या सायबर टोळीतील दोघांना नवी मुंबई पोलिसांच्या सायबर पोलिसांनी उत्तर प्रदेश येथून अटक केली. या कारवाईत अटक करण्यात आलेला आरोपी व त्यांच्या साथीदारांविरोधात विविध राज्यांत ७ सायबर फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याचे तसेच या टोळीचा देशातील विविध राज्यांत एकूण ११५ सायबर तक्रारींमध्ये सहभाग असल्याचे आढळून आले. सायबर पोलिसांना या टोळीच्या बँक खात्यातील तब्बल ३९ लाख ३५ हजारांची रक्कम गोठवण्यात यश आले आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांमध्ये मोहिनीश देवेंद्र राजपाल (३६) व अंशुमन अरमान सिंह (२३) या दोघांचा समावेश असून, हे दोघेही उत्तर प्रदेश राज्यातील आहेत. या आरोपींनी व त्यांच्या इतर साथीदारांनी महिला असल्याचे भासवून कळंबोलीतील ५९ वर्षीय व्यावसायिकासोबत मैत्री केली होती. त्यानंतर या टोळीने व्यावसायिकाला फॉरेक्स ट्रेडिंग व क्रिप्टो ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून जास्त फायदा मिळवण्याचे आमिष दाखवले. तसेच गत डिसेंबर महिन्यात त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यात ऑनलाइन पद्धतीने पैसे भरण्यास सांगून त्यांच्याकडून तब्बल ६० लाख २३ हजार रुपये उकळले होते. त्यानंतर या टोळीने आपले सर्व मोबाईल नंबर बंद करून व्यावसायिकाची फसवणूक केली होती. नवी मुंबईच्या सायबर पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल झाल्यानंतर सायबर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर टोळीने फसवणूक करण्यासाठी वापरलेले बँक खाते तसेच मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण केले असता, आरोपींचे वास्तव हे उत्तर प्रदेशमधील लखनौ येथे असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानंतर सायबर पोलिसांच्या पथकाने लखनौ येथे जाऊन या प्रकरणात सहभागी असलेल्या आरोपींचा शोध घेतला असता, मोहिनीश देवेंद्र राजपाल हा लॉज चालक पोलिसांच्या हाती लागला. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने इतर साथिदारासह सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी अधिक तपास करून या प्रकरणातील दुसरा आरोपी बेकरी चालक अंशुमन अरमान सिंह याला अटक केली. या प्रकरणात अटक करण्यात आलेले आरोपी व त्यांचे साथीदार गरजू लोकांना हेरुन त्यांच्याशी मैत्री करुन त्यांना विविध बँकेमध्ये करंट खाते उघडण्यास सांगत होते. त्यांनतर त्यांच्या बँक खात्यावर झालेल्या ट्रान्झेक्शनच्या टक्केवारीप्रमाणे कमिशन देण्याचे आमिष दाखवत होते. त्यांनतर ही टोळी सदर बँक खात्याचा उपयोग सायबर फसवणुकीसाठी करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

अटक आरोपीविरुद्ध दाखल गुन्हे

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपी व त्यांच्या साथिदारांविरोधात उत्तर प्रदेशमधील गौतम बुद्ध नगर, आंध्र प्रदेश-श्रीकालहस्ती, राजस्थान जयपूर, झारखंड, पुणे हिजंवडी, हरयाणा फरिदाबाद येथील सायबर पोलीस ठाण्यात सायबर फसवणुकीचे ७ गुन्हे दाखल असल्याचे तपासात आढळून आले आहे. त्याचप्रमाणे या आरोपांचा महाराष्ट्रातील ९ तसेच संपूर्ण देशातील विविध राज्यांत एकूण ११५ सायबर फसवणुकीच्या तक्रारींमध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपींच्या बँक खात्यातील रक्कम गोठवण्यात यश

या प्रकरणात फसवणूक झालेल्या व्यावसायिकाने ज्या बँक खात्यात रक्कम भरली होती, ते सर्व बँक खाते गोठवण्याबाबत सायबर पोलिसांनी तत्काळ पत्रव्यवहार केल्याने या बँक खात्यातील एकूण ३९ लाख ३५ हजारांची रक्कम गोठवण्यात सायबर पोलिसांना यश आले आहे. या गुन्ह्याचा तांत्रिक तपास हा नवी मुंबईच्या सायबर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक रोहित बंडगर, पोलीस शिपाई भाऊसाहेब फटांगरे, निरज दाभाडे व महिला पोलीस शिपाई पूनम गडगे आदींच्या पथकाने केली.

उत्तर प्रदेशच्या शस्त्र परवान्याचा मुंबईत वापर

■ मुंबईत खासगी सुरक्षा पुरवणाऱ्या तिघांविरोधात गुन्हा

■ **मुंबई** : स्व-संरक्षणासाठी उत्तर प्रदेश पोलिसांकडून शस्त्र परवाना घेऊन मुंबईत खासगी सुरक्षा पुरवणाऱ्या तिघांवर मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने कारवाई करत ३ पिस्तुले आणि २१ जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.

कुर्ला पूर्वेकडील नेहरूनगर परिसरात तीन जण स्व-संरक्षणासाठी उत्तर प्रदेश पोलिसांकडून शस्त्र परवाने घेतलेली पिस्तुले घेऊन खाजगी सुरक्षा पुरवत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या कक्ष ६ ला मिळाली होती. त्यानुसार, कक्ष ६ चे प्रमुख प्रभारी पोलीस निरीक्षक रवींद्र साळुंखे यांच्या नेतृत्वातील पथकाने सापळा रचून अनिलकुमार मिश्रा (५३), राजकुमार सिंग (५२) आणि देवनारायण जैस्वाल (४८) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याजवळ ३ पिस्तुले आणि २१ जिवंत काडतुसे सापडली. मूळचे उत्तर प्रदेशमधील रहिवासी असलेल्या या तिघांनी उत्तर प्रदेश पोलिसांकडून स्वतःच्या सुरक्षेसाठी शस्त्र परवाने घेतले. याच शस्त्र परवान्यांच्या आधारे त्यांनी तेथे देशी बनावटीची तीन पिस्तुले विकत घेऊन सुमारे १० वर्षांपूर्वी मुंबई

गाठली. मुंबईत वास्तव्य करून तिघेही मुंबई आणि ठाणे परिसरात खासगी सुरक्षा पुरवू लागले. त्यांनी या शस्त्रांची आणि परवान्यांची मुंबई पोलिसांकडे नोंद केली नाही. तसेच, सुरक्षा पुरवण्याचा परवाना किंवा खाजगी सुरक्षा एजन्सी नसताना त्यांनी शस्त्रांचा वापर खाजगी व्यक्तींच्या सेवेसाठी आणि व्यावसायिक कारणासाठी केल्याचे पोलीस तपासात समोर आले. अखेर पोलिसांनी या प्रकरणी शस्त्र अधिनियम कायद्याच्या अटी आणि शर्तीचे उल्लंघन केल्यप्रकरणी तिन्ही व्यक्तींविरोधात नेहरूनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. तिन्ही व्यक्तींजवळील पिस्तुले आणि काडतुसे जप्त करून कक्ष ६ चे पथक अधिक तपास करत आहे.

आरबीआय अधिकारी असल्याचे सांगत वृद्धाला घातला ९६ लाखांना गंडा

■ **मुंबई** : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची (आरबीआय) अधिकारी असल्याचे भासवत एका महिलेने भारत संचार निगम लि.मधून (बीएसएनएल) सेवानिवृत्त झालेल्या ६७ वर्षीय वयोवृद्ध व्यक्तीला ९६ लाख रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. फसवणूक झालेल्या वयोवृद्धाने दिलेल्या तक्रारीवरून मृदुला सुर्वे नावाच्या महिलेविरोधात गुन्हा दाखल करून काळाचौकी पोलीस तपास करत आहेत. लालबागमधील रहिवासी तक्रारदार यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, ते सध्या गोराई येथील एका वृद्धाश्रमात राहातात. तर, त्यांचा मुलगा हा गतिमंद असून तो विरारमध्ये असलेल्या एका वसतिगृहात राहात आहे. मुलीचा विवाह झाला असून ती पतीसोबत कांदिवलीमध्ये राहाते. जावयाच्या मामेभावाची पत्नी असलेल्या मृदुलाची नोव्हेंबर

२०१६ मध्ये तक्रारदार यांच्याशी ओळख झाली. तिने ती रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बँकेमध्ये अधिकारी असल्याचे तक्रारदार यांना सांगितले. याच वर्षी तक्रारदार हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांना मिळालेली रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या शेअर्समध्ये गुंतवणूक केल्यास दर ३ महिन्यांनी २ लाख रुपये व्याज मिळेल. यातून सर्व प्रश्न मार्गी लागतील, असे तिने सांगून तक्रारदार यांना तिच्याकडे गुंतवणूक करण्यास भाग पाडले. नातेवाईक असल्याने तिच्यावर विश्वास ठेऊन तक्रारदार यांनी तिच्याकडे गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. मे २०१७ मध्ये तक्रारदार यांनी मुदत ठेवीत असलेले २२ लाख रुपये पाठवले. ३ महिन्यांनी २ लाख रुपये व्याज न आल्याने तक्रारदार यांनी मृदुलाला विचारणा केली. तिने बँकेमध्ये लवकरच व्याज जमा होईल, असे आश्वासन देत अधिक गुंतवणूक करून जास्त व्याज देण्याचे आमिष दाखवून तक्रारदार यांच्याकडून आणखी ३४ लाख रुपये घेतले. पुढे तिने तक्रारदार यांच्याकडून थोडे थोडे करत एकूण ९६ लाख रुपये उकळले. तिने तक्रारदार यांना परतावा म्हणून दिलेले काही धनादेश खात्यात रक्कम नसल्याने वठले नाही. तसेच, तक्रारदार यांना गुंतवलेली रक्कमसुद्धा परत मिळाली नाही. मृदुलाने या रकमेचा अपहार केल्याची खात्री पटल्याने तक्रारदार यांनी अखेर काळाचौकी पोलीस ठाणे गाठून तिच्या विरोधात फसवणुकीची तक्रार केली.

गांजा विक्रीसाठी आलेला व्यक्ती अटकेत

नवी मुंबई : मुंबई-गोवा महार्गावरील पळस्पे फाटा येथे इर्टिगा कार घेऊन गांजा हा अमली विक्री करण्यासाठी आलेल्या व्यक्तीला अमली पदार्थ विरोधी पथकाने सोमवारी मध्यरात्री सापळा लावून अटक केली आहे. मोहम्मद वसीम मोहम्मद शफीक कुरेशी (४३) असे या व्यक्तीचे नाव असून पोलिसांनी त्यांच्याजवळ असलेला सुमारे सव्वाबारा लाख रुपये किमतीचा ६१ किलो २०० ग्रॅम गांजा व १० लाख रुपये किमतीची इर्टिगा कार जप्त केली आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे फाटा येथे एक व्यक्ती इर्टिगा कारने सोमवारी मध्यरात्री गांजा हा अमली विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीरज चौधरी व त्यांच्या पथकाने सोमवारी मध्यरात्री पळस्फे फाटा येथे सापळा लावला असताना त्या भागात दबा धरून बसलेल्या अमली पदार्थ विरोधी पथकाने त्याची धरपकड केली.

महिलेचा विनयभंग करून फरार झालेल्या आरोपीच्या शोधात पोलीस

■ **नवी मुंबई** : रबाळे येथील भीमनगरमध्ये राहणाऱ्या एका तरुणाने किरकोळ कारणावरून एका महिलेला भररस्त्यात शिवीगाळ व मारहाण करून तिचा विनयभंग केल्याचा प्रकार घडला. यातील आरोपीने पोलिसांना धक्काबुक्की व मारहाण करून पलायन केले. अक्षय ऊर्फ विनोद जाधव (३०) असे या आरोपीचे नाव असून, रबाळे एमआयडीसी पोलिसांनी त्याच्या विरोधात सरकारी कामात अडथळा आणून मारहाण केल्याप्रकरणी तसेच विनयभंग केल्याप्रकरणी असे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत. तसेच त्याचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणातील तक्रारदार पीडित महिला रबाळे परिसरात राहण्यास असून, ती सोमवारी सायंकाळी आपल्या मित्रासह रबाळे तलाव येथे फिरण्यासाठी गेली होती. त्या वेळी आरोपी अक्षय जाधव याने पीडित महिला व तिच्या मित्राला पाठीमागून आपल्या दुचाकीची धडक दिली. त्यामुळे दोघेही खाली पडल्यानंतर पीडित महिलेने त्याला जाब विचारला असता, आरोपी अक्षय जाधव याने उलट पीडित महिलेला शिवीगाळ करून तिच्या पोटात लाथ मारली. त्यानंतर त्याने तिच्या मित्रालादेखील मारहाण करत पीडित महिलेसोबत अश्लील वर्तन केले. त्यामुळे पीडित महिलेने नियंत्रण कक्षाच्या ११२ क्रमांकावर संपर्क साधून त्या ठिकाणी पोलिसांना बोलावून घेतले.

या वेळी आरोपी अक्षय जाधव हा बिट मार्शल पोलिसांसमोर पीडित महिलेला शिवीगाळ करून तिला मारण्यासाठी अंगावर धावून जात होता. त्यामुळे पोलीस शिपाई संतोष कानवडे यांनी आरोपी अक्षय जाधव याला शांत राहण्यास सांगून पीडित महिलेला पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी जाण्यास सांगितले. या गोष्टीचा आरोपी अक्षय जाधव याला राग आल्याने त्याने पोलिसांना शिवीगाळ करून त्याची पोलिसांसोबत चांगली ओळख असल्याचे सांगितले. तसेच त्याला पोलीस ठाण्यात नेल्यास तो स्वतःचे डोके आपटून त्यांची वर्दी उतरवून टाकण्याची पोलिसांना धमकी दिली. त्यानंतर त्याने पोलीस शिपाई कानवडे यांच्या अंगावर धावून जात कॉलर पकडली. त्यांनतर त्याने त्यांच्या सोबत धक्काबुक्की करून त्याठिकाणावरून पलायन केले.

या प्रकारानंतर रबाळे एमआयडीसी पोलिसांनी या घटनेतील पीडित महिलेच्या तक्रारवरून अक्षय जाधव याच्या विरोधात विनयभंग तसेच शिवीगाळ केल्याप्रकरणी तसेच पोलीस शिपाई कानवडे यांच्या तक्रारीवरून सरकारी कामात अडथळा आणून शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत.

दोन महिला हत्याकांडातील आरोपीला जामीन

तीन वर्षे खटला प्रलंबित

■ **मुंबई** : कारला अपघात झाल्याचे दाखवून दोन महिलांच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी अटकेत असलेल्या आरोपीला उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. न्यायमूर्ती माधव जामदार यांनी सरकारी पक्षाच्या दिरंगाईवर बोट ठेवत आरोपीना २५ हजारांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर तुरुंगातून सोडून देण्याचे आदेश दिले.

पुण्याच्या पुरंदर तालुक्यातील निरा येथे १ एप्रिल २०२१ रोजी सुनीता मोराळे व वैशाली काशीद या दोन महिला मॉर्निंग वॉक करत असताना कारच्या धडकेने जखमी झाल्या. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. सुरुवातीला जेजुरी पोलिसांनी हिट अँड रन अपघाताचा गुन्हा दाखल केला. मात्र अधिक तपासात विवाहबाह्य संबंधातून ही हत्या करण्यात आल्याचे उघड झाल्यानंतर पोलिसांनी मुख्य सूत्रधार किरण जेधे, त्याचा चुलत भाऊ रणजित जेधे व संकेत होले या तिघांना अटक केली.

गेली तीन वर्षे तुरुंगात असलेल्या संकेत होलेच्या वतीने ॲड. सत्यम निंबाळकर आणि ॲड. अभिषेक आरोटे यांनी उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला. त्या अर्जावर न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या समोर सुनावणी झाली. यावेळी आरोपीच्या वतीने ॲड. निंबाळकर यांनी बाजू मांडताना गेली तीन वर्षे आरोपी तुरुंगात आहे. सरकारी पक्षाने आरोप निश्चितीही केली नाही. तसेच आरोपपत्रात नावे असलेले २२ साक्षीदार तपासणे बाकी आहे. सरकार पक्षाच्या या संथगती कारभारामुळे खटला निकाली काढण्यास बराच कालावधी लागू शकतो. तसेच या खटल्यातील मुख्य सूत्रधाराची याआधीच जामिनावर सुटका झाली आहे. याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. याची दखल घेत न्यायालयाने आरोपीला २५ हजारांच्या वैयक्तिक जातमुचलक्याचा जामीन मंजूर केला.

विधानसभा अध्यक्षांचा ई-मेल आयडी हॅक करून राज्यपालांना ई-मेल

■ **मुंबई** : राज्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा ई-मेल आयडी हॅक करून राज्यपाल रमेश बैस यांना ई-मेल पाठवण्यात आल्याची खळबळजनक घटना सोमवारी घडली. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून मरिन ड्राईव्ह पोलीस अधिक तपास करत आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल नार्वेकर यांच्या अधिकृत ई-मेल आयडीवरून राजभवनाच्या अधिकृत ई-मेल आयडीवर ई-मेल पाठविण्यात आला होता. या ई-मेलमध्ये काही आमदार विधानसभेत नीट वागत नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. विधानसभेत राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान झालेल्या वादाचा संदर्भ देत आमदार दादा भुसे यांच्यासह अन्य एका आमदाराला लक्ष्य करण्यात आले होते. या ई-मेलनंतर राजभवनच्या अधिकाऱ्यांनी सत्यता पडताळण्यासाठी तातडीने राहुल नार्वेकर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधला. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला होता.

नार्वेकर यांच्या वतीने याबाबत मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध भादंवि कलम ४१९ आणि १७० यासह माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ (क) आणि ६६ (ड) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

वडाळ्यातील अपहरण झालेल्या १२ वर्षीय मुलाची हत्या

सराईत आरोपीच्या शोधात पोलीस

■ **मुंबई** : वडाळ्यातून महिनाभरापूर्वी अपहरण झालेल्या मुलाचे शीर धडापासून वेगळे करून निर्घृणपणे हत्या करत मृतदेह शांतीनगरजवळील खाडी पट्ट्यात फेकण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पोलिसांनी मुलाच्या मृतदेहाचे कुजलेल्या अवस्थेतील दोन्ही भाग ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. या प्रकरणी यातील संशयित आरोपीच्या विरोधात दाखल असलेल्या गुन्ह्यात हत्या करून पुरावे नष्ट केल्याच्या कलमांची वाढ केली आहे. पोलीस फरारी संशयित आरोपीचा शोध घेत आहेत.

वडाळा पूर्वेकडील शांतीनगर परिसरात राहात असलेल्या ४९ वर्षीय तक्रारदार यांचा मासे विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांचा १२ वर्षीय मुलगा हा येथील एका शाळेमध्ये सहावीत शिकत होता. २८ जानेवारीला शाळेला सुट्टी असल्याने तो घरीच होता. रात्री सव्वाआठच्या सुमारास बाहेर फिरायला जातो, असे सांगून घराबाहेर पडला, मात्र तो पुन्हा घरी परतलाच नाही. सर्वत्र शोध घेऊनही तो न सापडल्याने अखेर वडिलांनी वडाळा टी टी पोलीस ठाणे गाठून मुलगा हरवल्याची तक्रार दिली. त्यानुसार अपहरणाचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला.

पोलिसांनी शांतीनगर परिसरात केलेल्या चौकशीत येथील एका मुलाने यातील अपहृत मुलगा याच परिसरात राहणाऱ्या बिपुल शिकारी नावाच्या तरुणासोबत जाताना बघितल्याची महत्त्वपूर्ण माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली असता, हा मुलगा शिकारी याच्यासोबत जाताना येथील एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाला होता. त्यानुसार, पोलिसांनी संशयित आरोपी शिकारी याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपी शिकारी याला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणले. त्या वेळी त्याने डोक्याला झालेल्या जखमेचे टाके तोडले. रक्तस्राव सुरू झाल्याने रक्त धुवून येण्याचा बहाणा करून तो पोलीस ठाण्याजवळील बाथरूममध्ये गेला व तेथूनच पसार झाला. त्यानंतर महिनाभर शोध घेऊनही तो पोलिसांना सापडला नाही. दरम्यान, सोमवारी अपहृत मुलाचे कुजलेल्या अवस्थेतील धड आणि मंगळवारी त्याचे शीर येथील खाडी पट्ट्यात सापडले. मृतदेहाच्या अंगावरील टी शर्ट, हातातील कडे आणि चप्पल यावरून मृत मुलाची ओळख पाठवण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी मुलाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. या मुलावर लैंगिक अत्याचार करून हत्या करण्यात आल्याचा संशय असून, पोलीस संशयित आरोपी शिकारी याचा शोध घेत आहेत. मूळचा कोलकाता येथील रहिवासी असलेल्या संशयित आरोपी बिपुल शिकारीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल होता. गुन्ह्यात अटक होऊन कारागृहात असलेला शिकारी हा पॅरोलवर बाहेर पडल्यानंतर मुंबईत पळून आला. येथून तो मुलांच्या तस्करीमध्ये उतरल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

■ आरोपी बिपुल शिकारी हा काही दिवसांपूर्वीच वडाळ्यात राहायला आला होता. घटनेच्या दिवशी तो मुलाला जेवायला हॉटेलमध्ये घेऊन गेला होता. रात्री उशिरा शिकारी घरी परतल्यानंतर शेजाऱ्यांनी त्याला पकडून मुलाबाबत विचारणा केली. मात्र तो काहीच बोलत नसल्याने चोप दिला. त्यानंतर आरोपी शिकारी याने मुलाला तृतीयपंथीयांना विकल्याचे सांगितले. त्यानंतर शेजाऱ्यांनी त्याला पोलिसांच्या हवाली केल्याची माहिती नागरिकांनी दिली.

ट्रक उलटला, खैर चोरटे फरार

वनविभागाकडून लाखोंचा माल जप्त

■ **जव्हार** : काही दिवसांपासून खैर चोरीचे प्रमाण वाढले आहे. राजरोस रात्रीच्यावेळी अधिक पैसा खर्च करून खैरांची चोरी व्हायची आणि हे खैर चोरटे वनविभागाला थांगपत्ता लागू देत नव्हते. मात्र सोमवारी रात्री सारसून रोडवर केंघोडी ओहळात वळणावरील रस्त्याचा अंदाज आला नसल्याने खैरांनी भरलेला ट्रक पलटी होऊन झाडाला धडकला. ट्रक, खैर मालासह चोरटे पळून गेले आहेत. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात जव्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले.

खैर चोरटे सोमवारी ट्रक भरधाव वेगाने घेऊन जात होते. सारसून रस्त्यावर केंघोडी ओहळात रात्रीच्या वेळी टर्नवर रस्त्याचा अंदाज न आल्याने ट्रक पलटी होऊन ते खैर चोरटे पसार झाले.

हा प्रकार सकाळी नागरिकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी फॉरेस्ट वनविभागाला कळवून त्यानंतर पुढील कारवाई सुरू झाली. लाखो रुपयांचा खैरचा माल, ट्रकसह वनविभागाने जप्त केला आहे.